आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरूवार, १४ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २०१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 14 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-201 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# बारामतीच्या रिंगणात शिवतारे

## अजित पवारांवर घणाघाती प्रहार

आधुनिक केसरी न्यूज

**सासवड : माजी आमदार विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभेला रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी बुधवारी सासवडमध्ये अजित पवारांवर घणाघाती प्रहार करत बारामती लोकसभेला शड्डू ठोकला. यावेळी त्यांनी अजित पवार यांना नीच, उर्मट असे संबोधत बदला घेणार, अशा शब्दात आव्हान दिले. ब्रह्मराक्षस म्हणूनही त्यांचा उल्लेख केला.**

**पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हे कालचक्र कुठेतरी थांबलं पाहिजे :** मी महायुतीच्या विरोधात नाही. शंभर टक्के मी महायुतीचा शिंदे साहेबांच्या विचारांचा शिलेदार आहे. मी देवेंद्र फडणवीस यांना गुरु म्हणणारा माणूस आहे, नरेंद्र मोदींची निष्ठा मानणारा माणूस असून याच नरेंद्र मोदींच्या हातात तिसऱ्यांदा देश दिला पाहिजे, लोकांच्या हितासाठी दिला पाहिजे देश पुढे नेण्यासाठी दिला पाहिजे म्हणून या विचारांचा मी आहे. परंतु इथली लढाई ही वेगळी आहे. एक तरी आपल्याकडे ब्रह्मराक्षस आहे आणि लोकांची इच्छा आहे, माझी इच्छा नव्हती अचानकपणे करून लोकांना लोकांचा आदर करून मतदारांचा आदर करून मी इथे येत आहे. नमो विचार मंच या नावाखाली ही निवडणूक लढणार आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हे कालचक्र कुठेतरी थांबलं पाहिजे आणि अगदी देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेमध्ये हे कालचक्र आहे. बारामतीतील ही निवडणूक सुद्धा कालचक्राचाच एक भाग आहे आणि आम्ही सर्वजण जनतेच्या आशीर्वादाने निश्चितपणे निवडून येऊ.



शिवतारे म्हणाले की, बारामती मतदारसंघ हा काय कोणाचा सातबारा नाही. देशातील 543 मतदारसंघापैकी एक लोकसभेचा मतदार संघ आहे. ही मालकी कोणाची नाही. यामध्ये 6 विधानसभेचे मतदारसंघ आहेत आणि म्हणून पवार पवार करण्याऐवजी आपल्याला निश्चितपणे आपला स्वाभिमान जागृत करून लढलं पाहिजे. विशेषतः अजित पवार 2019 च्या निवडणुकीमध्ये मी जरी त्यांच्या मुलाविरुद्ध प्रचार केला होता, तो राजकारणाचा एक भाग आणि माझे कर्तव्य म्हणून केला होता. मी वैयक्तिक नव्हतो. परंतु अजित पवारांनी सभ्यतेची सगळी नीच पातळी गाठली. मी 23 दिवस लीलावतीमध्ये ॲडमिट होतो. मला बायपास करायला सांगितली. स्टेन टाकल्या फेल झाले आणि मी संपूर्ण कार्डिॲक ॲम्ब्युलन्समध्ये माझा प्रचार झाला. अजित पवारांनी पालखी तळावर सांगितलं, मरायला लागलाय तर कशाला निवडणूक लढवताय. खोटी सहानुभूती मिळवण्यासाठी ॲम्ब्युलन्समधून प्रचार केला. तुम्ही खोटं बोलत आहात, लोकांची साथ घेण्यासाठी हे खोटं चाललेले काम तुमचं आहे. माझ्या गाडीपर्यंत पोहोचले, कुणाची आहे, नंबर काढला इतक्या खालच्या थरावर अजित पवार आले. ते म्हणाले की, तू कसा पुढे निवडून येतो तेच मी आता बघतो. महाराष्ट्रभरामध्ये मी कुणाला पाडायचं ठरवलं तर मी कुणाच्या बापाचं ऐकत नाही, पाडतोच. राजकारणामध्ये एखाद्याला निवडून आणण्याची पॉझिटिव प्रवृत्ती असावी. गाव बसवायला अनेक लोक लागतात, गाव पेटवायला नालायक माणूस लागतो. त्यांना मी माफ केले होते, महायुती झाल्यानंतर. पण गुर्मी तशीच होती. त्यांचा उर्मटपणा कायम होता. म्हणून आम्ही अजित पवारांना मतदान करणार नाहीत असे लोकांनी सांगितले.

### महत्त्वाची बातमी

## अहमदनगर शहराचे नाव आता ‘अहिल्यानगर’

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अहमदनगर शहराचे नाव ‘अहिल्यानगर’ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. तर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचेही नाव बदलण्यात आले असून आता या तालुक्याला राजगड असे नाव देण्यात आले आहे. या निर्णयाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. उपमुख्यमंत्री कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले, राज्य सरकारचा हा निर्णय पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणारा, त्यांचे विचार, कार्य, स्मृती पुढे घेऊन जाणारा, लोकप्रतिनिधींना चांगले कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. यानिर्णयाने अहमदनगर शहरवासियांची, जिल्हावासियांची, महाराष्ट्रातील तेरा कोटी नागरिकांची महत्वाची इच्छा पूर्ण झाली आहे. हा निर्णय होण्यात आमदार संग्राम जगताप, दत्तामामा भरणे, आशुतोष काळे, नितीन पवार या लोकप्रतिनिधींनी महत्वाची भूमिका बजावली. त्या सर्वांचे तसेच समस्त महाराष्ट्रवासियांचे मी मनापासून अभिनंदन करतो, अशा असेही अजित पवार पुढे म्हणाले.



# वसंत मोरेंना भाजपात घेण्याच्या हालचाली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वसंत मोरे यांनी मनसेचा राजीनामा दिला. त्यानंतर अनेक कार्यकर्त्यांनीदेखील धडाधड राजीनामे दिले. त्यानंतर वसंत मोरे कोणत्या पक्षात जाणार याच्या चर्चा रंगल्या मात्र दोन दिवसांत मी सगळं जाहीर करेन असं ते राजीनामा देताना म्हणाले. त्यानंतर त्यांना विविध पक्षातून फोन आल्याचं ते म्हणाले. त्यासोबतच भाजपच्या मुरलीधर मोहोळांचा फोन आल्याचं त्यांनी सांगितलं. मुरलीधर मोहोळांचा फोन आल्याने ते भाजपात जाणार का?, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र वसंत मोरेंनी या सगळ्या शक्यतांना पूर्णविराम दिला आहे. वसंत मोरे म्हणाले की, मी राजीनामा दिल्यावर अनेकांना दुःख झालं. अनेक लोक मला मिळत असलेली वागणूक बघत होते. ते निरिक्षण करत होते. राजीनामा दिल्यावर काही वेळात मला मुरलीधर मोहोळांचा फोन आला. मुरलीधर मोहोळ आणि मी जुने चांगले मित्र आहोत. त्यामुळे मुरलीधर मोहोळांनी माझं सांत्वन करण्यासाठी फोन केला होता. तात्या तुझ्यासारख्या कार्यकर्त्यासोबत हे चुकीचं झालं, असं मोहोळ म्हणाले. मोहोळांनी मला संघटनेसाठी फोन नाही केला मित्र म्हणून फोन केला, असे मोरेंनी स्पष्ट केले. भाजप हा मोठा पक्ष आहे. भाजप माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना का बोलवतील?, असा सवाल मोरेंनी उपस्थित केला. मी माझा निर्णय घेतला आहे आणि या निर्णयाशी मी ठाम आहे. पुढचा निर्णय नक्की दोन दिवसांत घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मातोश्रीवरून आलेला शब्द मागे फिरणार नाही

## सांगली लोकसभा शिवसेनाच लढणार : चंद्रहार पाटलांची गर्जना

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या शिवसेना ठाकरे गटातील प्रवेशानंतर सांगलीत ठाकरे गट रिचार्ज झाला आहे. पैलवान चंद्रहार पाटलांच्या पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हा ठाकरे गट शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळावा सांगलीवाडीत पार पडला. यामध्ये सर्वच पदाधिकाऱ्यांनी आणि नेत्यांनी सांगली लोकसभा निवडणूक लढवण्याची आक्रमक भूमिका जाहीर केली. शिवसेनेचे उपनेते नितीन बानुगडे पाटील आणि पैलवान चंद्रहार पाटील यांच्या उपस्थितीमध्ये हा मेळावा पार पडला.



यावेळी बोलताना चंद्रहार पाटलांनी लोकसभा उमेदवारीबाबत शब्द दिला आहे. याचा साक्षीदार मातोश्री असून कोणत्याही परिस्थितीत सांगलीची लोकसभा निवडणूक आपण लढवणारच आणि ती जिंकणार देखील असा विश्वासही चंद्रहार पाटलांनी यावेळी व्यक्त केला. चंद्रहार पाटलांबरोबर लढताना विचाराने लढा, दुसऱ्या कोणत्याही भानगडीत पडू नका, आपण कुठेच तुम्हाला अडवणार नाही आणि कमी पण पडणार नाही, असा इशारा दिला. सांगली लोकसभा लढवणार आणि जिंकणार, असेही पुन्हा एकदा चंद्रहार पाटलांनी जाहीर केले आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी चंद्रहार पाटील यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत मातोश्रीवर जाऊन शिवसेना ठाकरे गटामध्ये प्रवेश केला होता. यावेळी उद्धव ठाकरे यांनी सुद्धा चंद्रावर पाटील यांचे जोरदार स्वागत करताना हा मर्द दिल्लीला पाठवायचा असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे सांगली लोकसभेसाठी चंद्रहार पाटील मैदानात असणार का? याची चर्चा रंगली आहे. चंद्रहार पाटील यांनी सुद्धा सांगली लोकसभा शिवसेनेची असल्याचे म्हटले आहे.

**माझ्या फिरण्याला शिवसेनेनं आधार दिला**

चंद्रहार पाटील म्हणाले की, मला सातत्याने विचारणा करण्यात आली. कोणताही पक्ष नसल्याने त्यामुळे सातत्याने काहीतरी करण्याचा प्रयत्न करत होतो. काहींनी विचारलं बैलगाडी स्पर्धा भरून मते मिळतात का? पण मी काहीतरी करू शकतो. मात्र, निष्क्रिय नाही. गेल्या दोन वर्षापासून मी नुसताच फिरत होतो. मात्र माझ्या फिरण्याला शिवसेनेनं आधार दिला. तो मी कधीच विसरणार नाही.

ते पुढे म्हणाले की, मला आदेश असल्याने फारसं बोलता येणार नाही. मात्र, मी फार काळ शांत राहू शकत नाही. कारण आता पैलवान आणि शिवसेना एकत्र आले आहेत. त्यामुळे चंद्रहार पाटलाशी लढताना विचार करून लढा, असे आव्हान त्यांनी दिले. आपल्यावर विश्वास टाकला तो विश्वास पात्र ठरवण्याचा आपण प्रयत्न करणार असून सांगली लोकसभेची जागा शंभर टक्के जिंकणार असल्याचे ते म्हणाले.

# पिटलाइन सुविधेमुळे बल्लारशाहचे महत्त्व वाढले : हंसराज अहीर


## बल्लारपूर व चंद्रपूर येथे रेल्वे गाडीचे जल्लोषात स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

चंद्रपूर : बल्लारपूर येथे बल्लारशाह-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट ट्रेन (क्रमांक २२१०९/२२११०) ला राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी हिरवी झेंडी दाखवली. दि. १३ मार्च रोजी या कार्यक्रमप्रसंगी बोलताना हंसराज अहीर म्हणाले की बल्लारशाहमध्ये ११ कोटी रुपये खर्चुन बांधण्यात आलेल्या पिटलाइनच्या सुविधेमुळे आता रेल्वे प्रवाशांना लांब पल्ल्यांच्या गाड्यांची सुविधा मिळणार असल्याचे सांगितले. बल्लारशाह-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट ट्रेन आज सुरु करण्यात आली. अहीर पुढे म्हणाले की, पूर्वी सहा डब्यांची आरक्षण असलेली सेवाग्राम लिंक एक्सप्रेस येथे धावत असे. लिंक एक्सप्रेस गाड्या आता संपूर्ण भारतात बंद करण्यात आल्या आहेत म्हणून ही गाडी सुरू करण्यात आली आहे. लवकरच नंदीग्राम ही ट्रेन दररोज धावणार आहे. तसेच आता पुण्यासाठीची ट्रेन आठवड्यातून तीन दिवस धावणार असून, ती येत्या दोन-तीन दिवसात सुरू होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी चंद्रपूर आणि बल्लारशाहसाठी रेल्वेच्या अनेक सुविधा दिल्या आहेत, असेही अहीर म्हणाले. एलटीटी-बल्लारशाह सुपरफास्ट एक्सप्रेस (क्रमांक ०११२७/०११२८) या गाडीला पूर्वी विशेष दर्जा होता. या ट्रेनचे भाडे प्रवाशांना परवडणारे नव्हते. विशेष दर्जा असल्याने ही ट्रेन नेहमीच उशिराने धावत असे. प्रवाशांच्या समस्या लक्षात घेऊन हंसराज अहीर यांनी या ट्रेनचा विशेष दर्जा काढून घेतला आहे. आता ही ट्रेन नव्या क्रमांकाने धावत असून, आता या ट्रेनच्या भाड्यातही ३० टक्के कपात करण्यात आली.




सदर ट्रेन चंद्रपूर रेल्वेस्थानकावर पोहचताच भाजप कार्यकर्त्यांनी या ट्रेनचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपाचे जिलाध्यक्ष हरीश शर्मा, विजय राऊत, खुशाल बोंडे, रेल आधिकारी, एडीआरएम पी एस खेरकर, एसीएम एच के बेहरा, दामोदर मंत्री, लखन सिंह चंदेल, अनिल फुलझले, अध्यक्ष श्रीनिवास सूंचूवार, रघुवीर अहीर, अरुण मस्की, राजु घरोटे, विनोद शेरकी, रेणुका दूधे, वैशाली जोशी, जयश्री मोहुर्ले, स्वामी रायबरम, देवेंद्र वाटकर, कांता ढोके, किशोर मोहुर्ले, आरती आक्केवार, हनुमानसिंह खेंगर, रामेश्वर पासवान, जुम्मन शेख, ममता बोज्जा, गुलशन खान, गुलशन शर्मा, विकास राजुरकर, ज्ञानेंद्र आर्य, गणेश सैदाने व कृष्णकुमार सेन, एम वेंकटेश्वरलू, जी राजूरकर, रविंद्र नंदनवार, रवी मिश्रा, योगेश बविस्कर, आरपीएफचे निरीक्षक पाठक रमणिकभाई चव्हाण, विनोद बजाज, नरेंद्र सोनी, प्रदीप माहेश्वरी, डॉ. भुपेश भलमे, डॉ. अशोक रोहरा, मिलींद दाभेरे, संजय मंथाने, अशोक बोथरा, नरेश लेकवानी, भाजपचे विठ्ठल डुकरे, मायाताई उईके, वंदना संतोषवार, प्रदीप किरमे, राजेंद्र तिवारी, अविनाश राखुंडे, प्रमोद शास्त्रकार, बि.बि. सिंह, शालु कन्नोजवार, राजेंद्र कागदेलवार, संजय खनके, मधुकर राउत, सुरेश यादव, मयुर भोकरे, प्रणय डंभारे, बाळा चंदनखेडे, चेतन शर्मा, पराग मलोडे, रेणुकाताई घोडेस्वार, किशोर बंडावार, नरेंद्र गुजराथींसह अनेकांची उपस्थिती होती.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

'पहाटेच्या रम्य आणि शांत वेळी...' अशा प्रकारची वाक्ये आता बहुधा कथा कादंबऱ्यातूनच वाचायला मिळतील की काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झालेली दिसते. पहाट किंवा सकाळ ही शांत आणि रम्य राहिल्याचे चित्र आता अभावानेच आढळते. निरनिराळ्या आवाजांनी पहाटेची ही रम्य आणि शांत वेळ प्रदूषित केली आहे. सकाळी पाच वाजल्यापासून वाहनांचे आवाज सुरु होतात. काही वाहने लवकर सुरु न झाल्याने त्यांचे मालक अक्सिलेटर वाढवून ती बराच वेळ सुरु ठेवतात. जवळपास असलेल्या काही मंदिर आणि मशिदीवरील भोंगे आरती, प्रार्थना आणि अजान आदी सुरु होतात. तुम्हाला ते ऐकण्याशिवाय काही चॉईस नसतो. पहाटेची शांत वेळ ध्यान करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी उत्तम असते असे म्हणतात. आता अशा या गोंगाटात ध्यान आणि अभ्यास कसा करणार ? सहा साडेसहा वाजेनंतर शाळेत जाणाऱ्या मुलांच्या रिक्षा आणि बसचे कर्कश हॉर्न सुरु होतात. मुलांनी तयार राहावे म्हणून ते लांबूनच हॉर्न वाजवत येतात. बऱ्याच वेळा मुलं शाळेसाठी तयार होऊन उभीच असतात, पण यांची हॉर्न वाजवण्याची सवय जात नाही. त्यावर काही टॅक्स नाही आणि त्यांना बोलणारं कोणी नाही. कोणी बोललंच तर तो वाईट ठरतो. मुलं शाळेत गेल्यावर कुठं हुश्श करत बसावं तोवर भाजीवाले, फळवाले, भंगारवाले तयार होऊन येतात. त्यांचेही आवाज तुम्हाला ऐकावेच लागतात. आता तर त्यांनी आपल्या गाड्यांवर आवाज रेकॉर्ड केलेले स्पिकर्स लावले आहेत. त्यामुळे त्यांचा ओरडण्याचा ताण कमी झाला पण जनतेला मात्र ते स्पीकर्सचे आवाज सहन करण्यापलीकडे पर्याय नाही. त्यानंतर नगरपालिकेची घंटा/कचरा गाडी येते. तिच्यावर लावलेल्या स्पीकर्समधून विविध प्रकारच्या गाणीवजा सूचना तुम्हाला ऐकाव्याच लागतात. हे सगळे कमी की काय म्हणून कुणीतरी शेजारी जोरात टीव्ही किंवा रेडिओ लावलेला असतो.



## आनंदी पहाट

## पैशाचे मूल्य समजून घ्यावे

आधुनिक केसरी

जेव्हा तुमच्याकडे बँकेत पुरेसा पैसा असतो, तेव्हा तुम्हाला तुमच्या डोक्यावर छप्पर असण्याची किंवा पुरेसे खाण्याबद्दल अथवा तुम्ही आजारी असताना डॉक्टरांना भेटण्यास सक्षम असण्याची चिंता करण्याची गरज नसते. याचा अर्थ असा की आपण स्थिर



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मध्यमवर्गीय जीवनाचा आनंद घेऊ शकतो. आपल्याकडील पैशाने आनंद विकत घेता येऊ शकत नसला तरीही; स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची शक्ती आपल्याला आनंदी बनवण्याच्या दिशेने खूप पुढे जाऊ शकते. म्हणूनच कठोर परिश्रम करणे, पैसे कमविणे आणि ते कसे वाचवायचे हे शिकणे खूप महत्वाचे आहे. अनेक लोक पैशाची पर्वा करत नाहीत; असे म्हणण्याचे एक कारण म्हणजे पैशाच्या प्रेमाला सर्व वाईटाचे मूळ असे वर्णन करण्यात आले आहे. हे खरे आहे, भौतिकवादी लोक पैशाचा ध्यास त्यांना त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करू शकतात. पण प्रत्यक्षात पैसा हे देवाणघेवाणीचे माध्यम आहे. विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांसाठी तुमच्या श्रमाचा व्यापार करणे पैशामुळे सोपे होते. पैशांशिवाय, जर तुम्हाला अन्न हवे असेल, तर तुम्ही थेट देऊ शकत असलेल्या सेवेच्या बदल्यात किंवा तुम्ही उत्पादित करू शकणाऱ्या उत्पादनाच्या बदल्यात अन्नाचा व्यापार करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीला शोधणे आवश्यक आहे. प्रत्येकजण हे ओळखतो की पैशाचे बाजारात एक विशिष्ट मूल्य आहे. म्हणूनच आपण इच्छित वस्तू किंवा सेवांसाठी त्याचा व्यापार करू शकतो. यामुळे बाजारातील तरलता वाढते, जी मालमत्ता किती सहज खरेदी किंवा विकली जाऊ शकते याचा संदर्भ देते. अर्थात, हे केवळ अशाच परिस्थितीत कार्य करते जेथे स्थिर असते आणि हे मूल्य ही दुर्मिळ वस्तू आहे; या वस्तुस्थितीवरून प्राप्त होते.



आधुनिक केसरी

## आनाहत नाद | आत्माराम ||


जीव शीव आत्मा | वास करी देही ||
योगी हा विदेही | मुक्तानंदी ||१||
चांगला वांगला | भेद नाही ज्यासी ||
स्थितप्रज्ञ त्यासी | ओळखावे ||२||
अनुभवावीन | सांगु नये ज्ञान ||
पोपटी सज्ञान | घात करी ||३||
साधनेच्या ठायी | ज्ञानाचे उमाळे ||
साध्याचे डोहाळे | पुरविती ||४||
एकांती बैसोनी | साधतो संवाद ||
अनाहत नाद | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)


## सर्वोच्च व अखंड सेवा

भारतभूमीला मातृत्वाच्या विराट श्रद्धेने भारतमाता संबोधले आहे.ही भारतमाता नराचा नारायण बनवणारी राष्ट्रदेवता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी "स्वतंत्रते भगवती त्वाम्हं यशोयुता वंदे "या प्रणम्य भावनेने "महनमंगले शिवास्पपदे शुभदे" असे भारत मातेचे स्तोत्र गायले आहे. राष्ट्रभाव राष्ट्रभक्ती सतत जागृत राहावी, राष्ट्रअस्मिता सतत टिकावी, त्यातून विश्वबंधुत्वाचा खरा विशाल अर्थ उमजावा, संकीर्णतेच्या सर्व भिंती पडून जाव्यात, खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य,समानता,न्याय,बंधुत्व या मूल्यांचे पालन व्हावे,माणसातला माणूस तेजस्वी बनवावा व मानवता सर्वत्र नांदावी यासाठी मानवी मनाला उत्तम संस्कार, उत्तम संदेश, प्रेरणा व श्रद्धा विश्वास यांची गरज आहे. ही गरज भागवणारे शाश्वत ग्रंथ भारत भूमीत निर्माण झालेले आहेत.काळाच्या ओघात त्यांचा विचार झाला नाही, किंबहुना ते विस्मरणात गेल्याने मोठी सामाजिक,सांस्कृतिक हानी घडून आली आहे. बिकट संकटांनी ग्रासलेल्या भविष्यकाळाचा वर्तमानाचा विचार करता या ग्रंथांचा मागवा घेणे, त्यांच्या शब्द सामर्थ्याची प्रचिती घेणे,त्यात व्यक्त झालेल्या मंत्राक्षरांनी देवी भगवतीला आळवणे,प्रार्थना करणे, आवश्यक आहे. या हेतूने श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्म मार्ग दिंडोरी ने कोटीचंडी,अब्जचंडी अश्या सर्वोच्च सेवेचे आवाहन केले आहे.यापूर्वी शतचंडी, सहस्त्रचंडी,आयुतचंडी,लक्षचंडी अशा यागांची कल्याणकारी फलश्रुती सर्व सेवेकऱ्यांनी अनुभवली आहे. कारगिल युद्ध, मुंबई वरील अतिरेकी हल्ला, वेगवेगळ्या आजरांच्या साथी, दुष्काळ, जलप्रलय, त्सुनामी अश्या भयानक समस्या जेव्हा देश व समाजासमोर उभ्या राहतात तेव्हा तेव्हा सेवेकरी लाखोंच्या संख्येने एकत्र येऊन माता भगवतीस साकडे घालतात.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


सब अनहद के ताल पर,
बाजत पूर्ण गम्भीर ।
वाद्यराज मिरिदंग है, ऊपर बायें धीर
।।३१।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/३१ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : डावीकडे वरती सर्व अनहदांच्या तालावर स्थिर, दृढ पूर्ण गंभीर सर्व वाद्यांचा राजा मृदंग वाजत आहे. ग्रंथकार सद्गुरु देवांनी या ब्रह्माण्डी अनहदांचे स्थान परत्त्वे वर्णन केले आहे. अशाप्रकारे अनहदांचे स्थान-भेदासहित वर्णन दुसऱ्या संत साहित्यात मिळत नाही. अनहदांना योगीजन प्रत्यक्ष करतात. त्यांच्या द्वारेच जगात सर्व वाद्य यंत्रांचा आविष्कार झाला आहे. पूर्ण शब्दवेत्ता वास्तविक रूपाने संगीतज्ञ असतो. साहित्य आणि संगीत दोघांचा समन्वय आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

## भवरोगापासून मुक्ततेचा उपाय - सत्संगती व नामस्मरण

आधुनिक केसरी



एका गावात एक वैद्य राहात होता. त्या वैद्याला कोणाला काय रोग झाला आहे हे तोंडावरून समजत असे. त्याने एक दिवस एका मनुष्याला आपल्या घरावरून जाताना पाहिले आणि त्याला आत बोलावले. वैद्याने त्या माणसाला सांगितले की, "तुला एक भारी रोग झाला आहे; पण मी सांगतो ते औषध घे आणि मी सांगेन त्याप्रमाणे पथ्य पाळ, म्हणजे तुझा रोग बरा होईल." वैद्याने सांगितलेले औषध आणि पथ्य त्या मनुष्याने पाळले नसते तर त्यात त्या वैद्याचे काही नुकसान होते का ? त्याप्रमाणेच संतलोक जे आपल्याला करायला सांगतात, त्यात त्यांना स्वतःला काही मिळवायचे असते का ? आपल्याला गुरू सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्याकरिता संतसंग करा आणि नामात राहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वतः अनुभव घेऊनच सांगत असतात. औषध सोपे असले म्हणून त्यात गुण नाही असे म्हणून कसे चालेल ? तुकारामांनी आपल्या उपासनेची शपथ घेऊन सांगितले आहे की, नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. तुमचा हल्लीच्या साधूंवर विश्वास नसला तरी समर्थ आणि तुकाराम यांनी सांगितले त्यावर तरी विश्वास ठेवायला काय हरकत आहे ? त्यांनी तुमच्या कल्याणाकरिताच ते साधन सांगितले आहे. ते तुम्ही न कराल तर त्यांचे काही नुकसान नाही, तुमचेच नुकसान आहे; तरी त्याचा विचार करा. आपल्याला रोग झाला आहे अशी आपली अगोदर खात्री झाली पाहिजे, म्हणजे निम्मे काम झाले. आपल्याला रोग झाला आहे असे पक्के कळल्यावर आपण औषध घेण्याचे टाळणार नाही. संसारात सुख नाही असे आपल्याला दिसत असताना, ज्या योगाने सुख मिळेल त्याच्या खटपटीला लागले पाहिजे. त्याकरिता होईल तितके नामात राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुम्हाला खरे समाधान मिळेल. एका मनुष्याने तीस वर्षे मनापासून नोकरी केली. तो म्हणाला, "भगवंताची पूजा आणि भक्ती कशी करावी हे मी नोकरीपासून शिकलो." त्याला विचारले, "ते कसे ?" तेव्हा त्याने उत्तर दिले, "नोकरीमध्ये वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. तो जिथे बदली करील तिथे आपल्याला जावे लागते; मग घरात अडचण असली तरी तिथे आपले काही चालत नाही. म्हणजे आपलेपण बाजूला ठेवावे लागते. आता मी सेवानिवृत्त झाल्यावर मालक तेवढा बदलला. आता मी वरिष्ठाच्या ठिकाणी भगवंताला ठेवले आहे. भगवंत हा श्रेष्ठ वरिष्ठ आहे, कारण तो माणसासारखा स्वार्थी नाही. तो अत्यंत निःस्वार्थी असल्यामुळे माझ्या हिताचेच नेहमी घडवून आणतो. म्हणून मी आता अत्यंत आनंदात आहे." याचप्रमाणे प्रत्येक माणसाने आपल्या प्रपंचापासून परमार्थ करायला शिकले पाहिजे. हेच आपल्या जीविताचे सार आहे.

**११०. अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.**

## ब्रम्हनिरूपण



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

विश्वाचा बंध ओलांडून अनंतपणे विलसणारे ब्रम्ह चिमुकल्या मानवी बुध्दीच्या ज्ञानाचा विषय कसा काय होणार. म्हणून ब्रम्ह दर्शन होण्यास बुध्दीच्या पलिकडे असलेली प्रतिभा नावाची ज्ञानशक्तिचा उदय मानवी बुध्दी मध्ये झाला पाहिजे. सद्गुरु च्या आशिर्वादाने प्रतिभा जागी होते. म्हणून परमार्थात सद्गुरूंचा आशिर्वाद फार मोलाचा आहे. तो मिळवण्यासाठी आपण दरवर्षी व्यासपूजा करतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १४ मार्च २०२४
adhunikkesari.com

# धुळ्यात राहुल गांधींचा भारत जोडो यात्रेसोबत महिला मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राहुल गांधींची धुळे शहरात महिला मेळाव्या सोबत भारत जोडो न्याय यात्रा आज धुळे जिल्ह्यात झाली. दोंडाईचा येथे राहुल गांधींची भव्य रॅली आयोजित करण्यात आली. यानंतर ते धुळे शहरात दाखल झाले. या मेळाव्यातून त्यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. तसेच महिलांसाठी त्यांनी पाच मोठ्या घोषणा केल्या आहेत. राहुल गांधी म्हणाले की, मागील वर्षी कन्या कुमारीपासून आम्ही 4 हजार किलोमीटरपर्यंत चालत भारत जोडो यात्रा काढली. लोकांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही कन्याकुमारीला गेलात. पण, मणिपूर, ओरिसा, बिहार, झारखंडमध्ये तुम्ही गेला नाहीत. म्हणून आम्ही ठरवले होते की, दुसरी भारत जोड यात्रा काढायची. याला भारत जोडो न्याय यात्रा नाव देण्यात आले. देशात 22 असे लोक आहेत. ज्यांच्याकडे जितकी संपत्ती आहे तितकीच 70 कोटी लोकांकडे आहे. 24 वर्षासाठी मनरेगासाठी जितकं बजेट लागते. तितकीच कर्ज माफी मोदी सरकारने 16 लाख करोड रुपये 22 उद्योगपतींना दिले आहे, अशी आरोप त्यांनी यावेळी मोदी सरकारवर केली आहे.

देशात 50 टक्के मागास लोक आहेत. पण याचा अंदाज कुणालाच नाही. यात 15 टक्के दलित आहेत. 15 टक्के अल्पसंख्याक आहेत. तर 8 टक्के आदिवासी आहेत. केवळ 90 लोक सरकार चालवतात. ते आयएएस लोक आहेत. कुणाला किती बजेट मिळणार हे ठरवतात. यात दलित केवळ 3 जण आहेत. एकही आदिवासी नाही. दलित 15 टक्के आहेत बजेटमध्ये हिस्सेदारी केवळ 1 टक्का आहे. जोपर्यंत जनगणना होणार नाही तो पर्यंत लोकांचा विकास होणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.



मोदींनी मोठ्या धूम धडाक्यात महिला आरक्षण दिले. फटाके फोडले नाचले आणि सांगितले गेले की, सर्वे पूर्ण झाल्यावर तुम्हाला आरक्षण देणार असे म्हणण्यात आले. काँग्रेसचे सरकार आल्यावर लगेच आरक्षण देणार. कोणत्याही सर्वेक्षणाची गरज नाही. सगळ्या गरीब महिलांना सरळ बँक अकाऊंटमध्ये एक लाख रुपये देणार. सरकारी नोकरीमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देणार. आशा अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या महिलांना केंद्र सरकारची भागीदारी दुप्पट करणार. सावित्री बाई फुले यांच्या नावाने नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल उघडणार. प्रत्येक जिल्ह्यात हे हॉस्टेल उघडण्यात येणार आहे.

## उद्यापासून सांगोल्यातून थेट मुंबईला एक्सप्रेस

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** पंढरपूर येथून दादर मुंबईला जाणाऱ्या दादर-पंढरपूर-दादर या एक्सप्रेस रेल्वेचा विस्तार व्हाया सांगोला, मिरज, सांगली मार्गे सातारा पर्यंत विस्तार करण्यात आलेली रेल्वे शुक्रवार १५ मार्च पासून सुरू होणार असल्याने सांगोलाकरांना मुंबई व साताऱ्यास थेट जाण्याची सोय होणार आहे. या बाबतचे प्रसिध्दी पत्रक मध्य रेल्वेने प्रसिद्ध केले आहे. या रेल्वेमुळे सांगोलाकरांची अनेक दिवसांपासून मुंबईला थेट जाण्याची मागणी पूर्ण होणार आहे.

ट्रेन नं. ११०२७ दादर-पंढरपूर ही गाडी आठवडयातून रविवार, सोमवार व शुक्रवारी धावणार आहे, ही रेल्वे दादर हुन रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी निघून सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी पंढरपूर येथे पोहचेल. पुढे हीच रेल्वे, सांगोला, म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठेमहंकाळ, मिरज, सांगली, भिलवडी, किर्लोस्करवाडी, ताकारी, कराड, मसुर, कोरेगाव येथे थांबा घेत सातारा येथे दुपारी २ वाजून १० मिनिटांनी पोहोचेल. परत तीच रेल्वे ट्रेन नं. ११०२८ सातारा- दादर ही



सातारा येथून ३ वाजून २० मिनिटांनी निघुन पंढरपूर येथे वरील सर्व थांबे घेवून व्हाया मिरज, सांगोला मार्गे रात्री ९ वाजून ३५ मिनिटांनी पंढरपूर येथे पोहोचून ९ वाजून ४० मिनिटांनी दादर- मुंबई कडे कुर्डूवाडी मार्गे रवाना होणार आहे. विस्तारीत सातारा-दादर ही रेल्वे सोमवार, मंगळवार व शनिवारी धावेल तर दादर - सातारा ही रेल्वे रविवार, सोमवार व शुक्रवारी धावणार आहे. या विस्तारीत रेल्वे मुळे सांगोलाकरांना मुंबई, पुणे, सातारा, कराड येथे जाण्याकरिता थेट सांगोल्यातून एक्सप्रेस रेल्वेने प्रवास करता येणार असल्याने प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

## महाराष्ट्राचा इतिहास जाणून घेण्यासाठी मराठीचे वाचन आवश्यक : प्रा. शाम हेडाऊ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्र ही



क्रांतिकारकांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, चोखामेळा, सावता माळी, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी अफाट असं मराठी साहित्य लिहून ठेवलेल आहे. शिवाय महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांचा हा महाराष्ट्र आहे. साने गुरुजी, पु.ल. देशपांडे, व. पु. काळे , प्र. के. अत्रे अशा साहित्यिकांनी सुद्धा महाराष्ट्राच्या साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा इतिहास आणि महाराष्ट्र समजून घ्यायचा असेल तर महाराष्ट्राची मातृभाषा असलेली मराठी भाषा ही अवगत करून त्यातील ज्ञानाचा साठा नियमित वाचत राहायला हवा. यातूनच तरुणाईला प्रेरणा मिळते, असे मत प्रा. शाम हेडाऊ यांनी व्यक्त केले.

सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील एससीएमएस विभागाद्वारे आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या अनुषंगाने मुख्य वक्ता म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डायरेक्टर डॉ. समीर पिंगळे, प्रा. शाम हेडाऊ , लेखिका ,कवयित्री सौ.सना पंडित, मराठी विभागाच्या प्रा. सायली लाखे पिदळी आदींची उपस्थिती होती. दीपप्रज्वलन , महाराष्ट्र गीत आणि कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना प्रा. शाम हेडाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, सावरकरांची जन्मठेप, साने गुरुजींचे श्यामची आई, ग्रामगीता या सर्व पुस्तकातून जीवन जगण्याची एक नवीन दृष्टी मिळते, विचारांना नवी दिशा प्राप्त होते आणि आयुष्यातील सर्वच प्रसंगांमध्ये ठामपणे उभे राहण्याची क्षमता या पुस्तकांतून मिळते. त्यामुळे अशा मराठी भाषेवर प्रेम करून, आपणही मराठी भाषा अवगत करून त्यातील पुस्तक वाचावीत, असे आवाहन यावेळी विद्यार्थ्यांना केले.

लेखिका व कवयित्री सना पंडित यांनी पुस्तकांचे गाव असलेल्या भिलार ची गोष्ट विद्यार्थ्यांना सांगितली . वाचन चळवळ रुजविण्यासाठी तेथील लोकांचे योगदान , त्यांनी यावेळी विशद केले आणि विद्यार्थ्यांनी दर महिन्याला एक मराठी पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डायरेक्टर डॉ. समीर पिंगळे यांनी मराठी गौरव भाषा दिवस हा पारंपारिक पद्धतीने साजरा व्हावा यासाठी सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना पारंपरिक वेशभूषेमध्ये येत त्यांच्या डोक्यावर मराठमोळे भगवे फेटे बांधण्याची संकल्पना समोर ठेवत सिम्बॉयसिस मध्ये प्रथमच मराठी गौरव भाषा दिवस साजरा करीत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद प्राध्यापकांचा सहयोग आणि मराठी भाषा मराठी प्रा. सायली लाखे यांनी कार्यक्रमाचे केलेले नियोजन व त्यातील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग याचे कौतुक केले. पुढील वर्षी हा कार्यक्रम आणखीन मोठ्या प्रमाणात घेण्यात येईल आणि विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम निर्माण करण्याचा आम्हीही प्रयत्न करू असे मत यावेळी व्यक्त केले.

मराठी भाषा गौरव दिवस आयोजनामागची भूमिका विशद करत असताना प्रा. सायली लाखे यांनी गैर मराठी विद्यार्थ्यांपर्यंत मराठी भाषा पोहोचविण्यासाठी या दिवसाचे निमित्त साधत मराठीची महती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाच्या औचित्याने या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजल रणवीर हिने केले तर, मराठी भाषेचे महत्व प्रणव डांगे याने व्यक्त केले. आपल्या सुमधुर आवाजात राघव फडणवीस याने पसायदान सादर करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापकवृंद , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह होता त्यांनी अथक परिश्रम घेतले .

## काँग्रेसची गॅरंटी व्यक्तीची नाही तर पक्षाची

### जयराम रमेश यांचा भाजपवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत जोडो न्याय यात्राचे पाच न्याय स्तंभ आहेत व १४ जानेवारीपासून आतापर्यंत शेतकरी न्याय, युवा न्याय, भागिदारी न्याय व महिला न्याय गॅरंटी जाहीर केल्या आहेत. पाच गॅरंटीमधून काँग्रेसचा हा २० कलमी कार्यक्रम असून ही गॅरंटी एका व्यक्तीची नाही तर काँग्रेस पक्षाची आहे. राजकीय शब्दकोषात गॅरंटी हा शब्द वापरणारा देशातील पहिली व्यक्ती राहुल गांधी आहेत. कर्नाटक विधानसभा निवडणुक प्रचारावेळी त्यांनी पाच गॅरंटी जाहीर केल्या होत्या त्यानंतर तेलंगणातही अशाच गॅरंटी जाहीर केली होत्या आता या गॅरंटींची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यावेळी या गॅरंटी शब्दावर भाजपाने टीका केली होती परंतु आज दररोज मोदी गॅरंटी, मोदी गॅरंटी यावरच त्यांना भर द्यावा लागत आहे, असा हल्लाबोल अखिल भारतीय काँग्रेस कमिटी मीडिया विभागाचे प्रभारी जयराम रमेश यांनी केला आहे.

धुळे येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना जयराम रमेश म्हणाले की, महिला न्याय गॅरंटी ची घोषणा ही ऐतिहासिक व क्रांतीकारी आहे. मोदींनी १० वर्षात दिलेली एकही गॅरंटी पूर्ण केलेली नाही. देशातील काही मुठभर लोकांना मोदी सरकारने १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले पण शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले नाही. युपीए सरकारने मात्र शेतकऱ्यांचे ७२ हजार कोटी रुपयांचे कर्जमाफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यास कर्जमाफी संदर्भात एक आयोग स्थापन करून शेतकऱ्यांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची माहिती संकलीत केली जाईल व कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला जाईल. अग्निवीर योजना ही देशाच्या सुरक्षेला धोकादायक आहे काँग्रेस सत्तेवर आल्यास या योजनेचीही समिक्षा केली जाईल. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सावित्रिबाई फुलेंच्या जन्मभूमी व कर्मभूमीत महिला सक्षमिकरणाची महिला न्याय गॅरंटी दिली ही खऱ्या अर्थाने सावित्रिबाईंचा गौरव आहे, सावित्रीबाई फुले यांच्या विचाराला ताकद देणारा आहे. स्व. पंतप्रधान राजीव गांधी



यांनी स्थानिक स्वराज संस्थात महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांचा भागिदारी वाढलेली दिसत आहे. महिला सक्षमिकरणात काँग्रेस पक्षाचा मोठा वाटा आहे. भाजपा सारखा चुनावी जुमला अथवा मोदी गॅरंटी सारखी खोटी नाही, काँग्रेसची गॅरंटी ही पक्की व वॉरंटी सुद्धा आहे. महिला न्याय गॅरंटी जाहीर केल्याबद्दल प्रदेश कार्याध्यक्ष आमदार प्रणिती शिंदे, आमदार कुणाल पाटील, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे यांनी पत्रकार परिषदेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी व काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात, CWC सदस्य खासदार चंद्रकांत हंडोरे, माजी मंत्री के. सी. पाडवी प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, धुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शाम समोर उपस्थित होते.



## मिशन दिव्यास्त्र

आधुनिक केसरी

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम बेटावरून भारताने परवा 'अग्नी पाच' या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची बहुलक्ष्यभेदी प्रक्षेपकाच्या साह्याने यशस्वी चाचणी केली. अशा प्रकारची क्षमता असलेला भारत हा जगातील सहावा देश ठरला आहे. केवळ पाकिस्तान-चीनच नव्हे; तर युरोप आणि आफ्रिकाही भारतीय क्षेपणास्त्राच्या टप्प्यात आले आहेत. सन २००८पासून भारतीय संरक्षण व विकास संस्थेच्या (डीआरडीओ) वतीने या मोहिमेचे काम सुरू आहे. डीआरडीओतील 'रिसर्च सेंटर इमारत'(आरसीआय), 'ॲडव्हान्स्ड सेंटर लॅबोरेटरी'(एएसएल) आणि 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट लॅबोरेटरी'(डीआरडीएल) मधील शास्त्रज्ञ यामध्ये सहभागी झाले होते. 'मेक इन इंडिया' अंतर्गत सुरू असलेल्या गेल्या १६ वर्षांच्या या तपश्चर्येला 'अग्नी पाच'च्या रूपाने फळ आल्याने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओमधील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञांचे कौतुक केले आहे. 'अग्नी पाच' ही पाच हजार ४०० किलोमीटरचा पल्ला असलेली जमिनीवरून व हवेतून मारा करणारी आंतरखंडीय क्षेपणास्त्रे (इंटरकाँटिनेन्टल बॅलिस्टिक मिसाइल) आहेत. सन २०१२, १३, १५, १६ व २०१८ अशा या क्षेपणास्त्राच्या पाच चाचण्या आत्तापर्यंत झाल्या. 'अग्नी तीन' हे भारताचे आजवरचे सर्वाधिक, म्हणजे साडेतीन हजार किलोमीटर पल्ल्याचे क्षेपणास्त्र होते. आता 'अग्नी पाच'ची चाचणी यशस्वी झाल्यानंतर पाकिस्तान, चीनसह युरोप आणि अफ्रिकेचा काही भागही भारतीय क्षेपणास्त्राच्या टप्प्यात आला आहे. १७ मीटर लांब व दोन मीटर रूंद असलेल्या या क्षेपणास्त्राचे वजन सुमारे ५० टन आहे. साधारण तीन ते चार टन वजनाची स्फोटके वा अण्वस्त्रे वाहून नेण्याची याची क्षमता आहे. घन इंधनाचा वापर करण्यात येणारे हे क्षेपणास्त्र सहजी वाहून नेता येते आणि सहजी प्रक्षेपितही करता येते. ध्वनीच्या २४पट वेगाने मारा करण्याची या क्षेपणास्त्राची अचाट क्षमता आहे. 'मल्टिपल इन्डिपेन्डन्टली टार्गेटेबल रिएंट्री व्हेइकल' हे तंत्रज्ञान १९७०च्या दशकात अमेरिकेने विकसित केले. पुढे रशिया व अन्य देशांनी या तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरखंडीय क्षेपणास्त्रांची चाचणी केली. या क्षेपणास्त्राच्या टोकावर दोन ते दहा स्वतंत्र अस्त्रे असतात. एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करणे, हे या क्षेपणास्त्रांचे वैशिष्ट्य असून वातावरणाच्या बाहेरपर्यंत ते प्रक्षेपित करता येते. 'अग्नी पाच' क्षेपणास्त्र प्रक्षेपित केल्यानंतर त्याने एकापेक्षा अधिक निर्धारित लक्ष्यांचा अचूक वेध घेतल्याच्या नोंदी रडारवर करण्यात आल्या, ही या चाचणीच्या यशाची मोठी पावती ठरली. त्यामध्ये स्वदेशी बनावटीच्या 'ॲव्होनिक' प्रणालीचा वापर झाला असून जीपीएस सिस्टम व अत्याधुनिक 'सेन्सर' बसविण्यात आल्याने ही अचूकता साधली गेली. विभागीय सामरिक परिस्थितीत पाकिस्तानपेक्षा चीनच्या संभाव्य धोक्याविषयी भारताला सजग राहून संरक्षणसज्जता वाढवावी लागणार आहे. त्यामध्ये हा टप्पा महत्त्वाचा आहे. 'अग्नी पाच'च्या यशस्वी चाचणीनंतर अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स व चीन या देशांच्या पंक्तीत भारत गेला आहे. स्फोटके व अण्वस्त्रे वाहून नेण्याची क्षमता असलेले हे क्षेपणास्त्र संरक्षण दलात सहभागी झाल्यानंतर जागतिक पटलावर भारताचे भूराजकीय महत्त्व वाढेल. बदलत्या काळात अण्वस्त्रांचा प्रत्यक्ष वापर होण्याची शक्यता जवळपास नसली, तरी 'अण्वस्त्रधारी देश' बनणे, हे प्रतिबंधक (डिटरन्स) कवच ठरते; म्हणजेच अण्वस्त्रसज्ज देशाची बाजू कोणत्याही संघर्षात भक्कम व वरचढ ठरते. वेगवेगळ्या देशांशी संबंध राखताना आणि देशहिताचे रक्षण करण्यात ही महत्त्वपूर्ण बाब असून वेगवेगळे करारमदार करताना व आपली धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला या क्षमतेचा फायदा होणार आहे. त्यामुळेच 'महासत्ता' बनण्याच्या भारताच्या वाटचालीत 'अग्नी पाच' ची यशस्वी चाचणी हा महत्त्वाचा टप्पा आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

## अजूनही लोकशाही वाचवू शकतो..

आधुनिक केसरी

**देशामध्ये हुकुमशाही कशी बळकट होत आहे याची जाणीव आता लहान लहान लेकरांनाही होत आहे. लोकशाहीची हत्या करून हुकुमशाही लादण्याची प्रक्रिया खुप दिवसापासून सुरू आहे. हुकुमशाही किंवा लोकशाही ची हत्या एका दिवसात, एका वर्षात झाली नसुन ती हळूहळू करण्यात येत आहे. लोकशाही ची हत्या करण्यामध्ये एकाच पक्षाचा, एकाच नेत्याचा हात नसुन एक व्यवस्था वेगवेगळ्या भ्रष्ट नेत्यांवर दबाव टाकुन लोकशाही ची हत्या करण्यासाठी सहभागी करून घेत आहे.**

जनतेच्या नावाचे हजारो करोडो रुपये लाटून भ्रष्ट्राचार केलेले नेते स्वतः ची संपती वाचवण्यासाठी ईडीच्या भितीने आपल्याच हाताने लोकशाहीची हत्या करण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करत आहेत.

जी विषमतावादी व एकहाती व्यवस्था उलथून टाकुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून देशात समतावादी व जनकल्याणाची लोकशाही स्थापण झाली. हि लोकशाही विषमतावादी व एकहाती सत्तेची फळे चाखणाऱ्या आणि लोकांना अज्ञानी ठेवून अंधविश्वास, पांखड आणि विषमतेची पेरणी करून माणसाचे हक्क अधिकार नाकरून माणसाला सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्यापासुन दुर ठेवणाऱ्या, माणासाला माणसाच्या स्पर्शाने विटाळ होतो असे मानणाऱ्या निच मानसिकतेच्या लोकांना खटकत आहे. लोकशाही मुळे सर्वजन समान झाले सर्वांना समान संधी निर्माण झाली. कालपर्यंत शेती करणारा कुणबी, मडके घडवणारा कुंभार, बाग काम करणारा माळी, मेलेली जनावरे वढणारा मांग, महार, स्वच्छता करणारा भंगी, घरे बांधणारा गवंडी, कपडे धुणारा धोबी, शेळ्या मेंढ्या राखणारा धनगर, जंगलात भटकंती करणारा आदिवासी अशा सगळ्या अठरा पगडजाती च्या लोकांना कोणत्याही प्रकारचा भेद न करता माणूस म्हणून ओळख निर्माण करून तर दिलीच परंतु पिढ्यानपिढ्या एकच व्यवसाय करून गुलामी जिवन जगण्याची बेडी तोडून संसद, राज्य विधीमंडळ, न्यायमंडळ, प्रशासन प्रत्येक क्षेत्रात जाऊन देशाचा कारभार करण्याची ताकद संविधानाच्या रुपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय नागरिकांना दिली.लोकांनी शिक्षण घेऊ नये, माणसाने माणसाजवळ ही येऊ नये अशी निच माणसिकता असलेल्या लोकांना एवढ्या व्यापक जनकल्याणाची लोकशाही व लोकशाहीने प्रदान केलेले हक्क अधिकार कसे पचणी पडणार? म्हणून त्यांनी सुरवाती पासुन च लोकशाही समाजात रुजुच नाही, आणि लोकशाही मध्येही एकाच वर्णातील भले व्हावे यासाठी प्रयत्न करत होते. हजारो वर्षापासून शिक्षण, हक्क-अधिकार, माणूस म्हणून नाकारले होते. लोकांना विकासापासून दुर ठेवले होते. संविधानात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जरी सर्व जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून तरतूद केली असेल परंतु लोकशाही ची अंमलबजावणी ज्या लोकांच्या हाती होती त्या लोकांनी लोकशाही चे गांभीर्य लोकांपर्यंत पोहचूच दिले नाही. फक्त बोटाला शाही लावायची अर्थात निवडणूकी पुरतीच लोकशाही मर्यादित करण्याचा प्रयत्न केला गेला. संविधानाने लोक शिकु लागले, नोकरी मिळवु लागले परंतु शिकलेल्या व नोकरी लागलेल्या लोकांनी संविधान कधी समजून घेतलेच नाही. संविधानाने शिक्षण नोकरी मिळणाऱ्या लोकांनी च संविधानाला विरोध करून एकाच वर्णाची गुलामी करण्यात धन्यता मानली आणि आपली वैचारिक पातळी एकाच वर्णाच्या पायावर ठेवली. संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून तरी फक्त बौद्ध लोकांनी सुरवाती पासुन संविधान व हक्क अधिकारी याबाबत उघडपणे आणि ताकदीने भुमिका घेतली. बाकीच्या डोक्यात तर आजही संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल प्रचंड अज्ञान आहे. संविधानाने हक्क अधिकार, माणवी स्वातंत्र्य दिल्याने आजचे वैभव आले हेच बऱ्याच लोकांना पचत नाही. आणि संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले आणि ते लागु झाले म्हणून जळफळाट होऊन बुद्धीने मागास लोकांची आजही कमी नाही. संविधान व लोकशाही धोक्यात आल्याने लोकांच्या समस्या खुप वाढल्या आहेत. आता लोक सामाजिक समस्येवर बोलत आहेत, सरकार विरोधात आवाज उठवत आहेत. परंतु पैशाचा आणि सत्तेचा दुरुपयोग करून आमदार खासदार कधी पक्षांतर करतील आणि सत्य बोलुन लोकांना जागृत करणाऱ्यांना कधी गोळी लागेल किंवा तुरुंगात जावे लागेल हे सांगताच येत नाही. म्हणून समस्या अजून जटील होत आहेत. समस्या जटील झाल्याने लोक रस्त्यावर उतरून लोकशाही व हक्क अधिकार याविषयी बोलत आहेत. निवडणुकीच्या माध्यमातून देशातील व्यवस्था बदलुन लोकशाही चे जतन व्हावे असेही बऱ्याच लोकांना वाटत आहे. परंतु जनमत विरोधात असताना ईव्हीएम च्या माध्यमातून निवडणूक जिंकून हुकुमशाही मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.



इव्हीएम बंद केली तर व्यवस्थेला खुप मोठा धक्का बसणार परंतु निवडणूकीमध्ये भ्रष्टाचार करून सत्ता हाती घेऊन लोकशाही संपुष्टात आणण्याचे नियोजन सुरू आहे. सरकारला प्रश्न विचारने, सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणावर बोलणे गुन्हा होत आहे. सत्तेचा दुरुपयोग करून सर्व स्वायत्त संस्थेला हाताशी धरून सरकारच्या मर्जीने काम करून घेतले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या विधानावर सरकार कडुनच ट्रोल केल्या जाते, भ्रष्टाचारी लोकांना सत्तेसाठी एकत्र केले जाते. आमदार खासदार यांच्या वर अमाप खर्च तर सर्वसामान्य लोकांच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्यासाठी निधीच नसतो, तलाढ्यापासुन तर सचिवा पर्यंत कोणतेही काम पैसा दिल्या शिवाय होत नाही. सर्व सामान्य लोकांना त्यांच्या हक्काचे काम करून घेण्यासाठी चकरा मारून लाच द्यावी लागते. प्रत्येक राज्यात सर्व सामान्य जनता सरकार विरोधात मोठमोठे आंदोलन करत आहेत. ते आंदोलन दडपून टाकण्यासाठी आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येतात, शेतकरी आंदोलकांना अडवण्यासाठी सिंमेटचे अडथळे, खिळे, अश्रुधुर, थंडे पाणी, पोलिसांचा वापर केला जातो. आंदोलकांची चौकशी साठी एस आयटी तयार होते. परंतु लुटेरे, खुनी हे लोक राजकीय नेत्यांच्या आशिर्वादाने मोकाट फिरतात त्यांच्या साठी चौकशीचे तिनतेरा असतात. एकंदरीत लोकशाही बाजूला सारून हुकुमशाही ची सुरवात झालेली आहे. परंतु आपण अजूनही लोकशाही वाचवू शकतो. सर्वांनी जात धर्म, पक्ष बाजूला सारून एकत्र येणे आवश्यक आहे. लोकशाही वाचवण्यासाठी एकमेव व प्रभावी उपाय म्हणजे सत्ता परिवर्तन होय. आणि सत्ता परिवर्तन तेव्हा च शक्य आहे जेव्हा इव्हीएम बंद होईल. परंतु इव्हीएम बंद होऊ नाही म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न भाजपने केले आहेत. अशा परिस्थितीत लोकशाही वाचायला पाहिजे असे ज्यांना वाटते ते लोक, राजकीय पक्ष यांनी येणाऱ्या निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघात किमान पाचशे उमेदवार उभे करून निवडणूक आयोगाला बँलेटपेपरवर निवडणूक घेण्यासाठी भाग पाडावे. सर्व जन लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र आले आणि इव्हीएम नको असेल तर प्रत्येक मतदारसंघात पाचशे उमेदवार उभे करणे काही मोठी गोष्ट नाही.

असे केल्याने इव्हीएम बाजूला करून बँलेटपेपरवर निवडणूक घ्यावी लागेल. आणि बँलेटपेपरवर निवडणूक झाली की भ्रष्टाचारी टोळी व लोकशाही विरोधी टोळीला घरचा रस्ता दिसल्या शिवाय राहणार नाही. बँलेटपेपरवर निवडणूक झाली तर चारशे सोडा चाळीसह लोक निवडणूक येणार नाहीत. लोकशाही विरोधी लोक जर सभागृहात च गेले नाही तर किमान सभागृहात गेलेले लोक लोक हिताचे काम करून जनतेचे हक्क अधिकार अबाधीत ठेवून संविधान व लोकशाही चे संरक्षण तरी करतील. म्हणून देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात पाचशे पेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज भरून निवडणूक आयोगाला बँलेटपेपरवर निवडणूक घेण्यासाठी मजबूर केले तर नक्कीच लोकशाही वाचवण्यासाठी हातभार लागेल. परंतु नकारात्मक विचार करून आपण केल्याने काय होईल असे बोलुन दुर्लक्ष केले तर एक गोष्ट लक्षात घ्यावी याच विचार आणि आचाराने सुर्वण लोकशाही असुनही हुकुमशाही चे चटके सहन करावे लागत आहेत. जाती धर्माचे आणि हुकुमशाही ला पोषण वातावरण हाणून पाडून, जाती धर्मात तेढ निर्माण करणाऱ्या निच लोकांना बाजूला सारून आपण देश व देशातील जनतेसाठी लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र आलो तर अजूनही लोकशाही वाचवू शकतो.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## अर्धसत्य हे असत्यापेक्षाही घातक असते

आधुनिक केसरी

**कोणत्याही बाबीच महत्व हे त्या बाबींच्या सत्यनिष्ठ पणावर अवलंबून असतं.असत्य हे जरी घातक असल तरी देखील अर्धसत्य हे त्या पेक्षाही घातक असते.अर्धसत्य हे जरी वरकरणी अमृततुल्य दिसतं असलं तरी देखील ते विष आहे .पण बहुतांश लोक त्याला बासुंदी समजुन स्वतःही स्वीकारतात आणि इतरांनाही ते स्वीकारण्यासाठी आग्रही असतात हिच खरी शोकांतिका आहे.पण हि बासुंदी खाताना लक्षात येत नाही मात्र परिणाम घातक येतात.प्रत्येक क्षेत्रातील अर्ध सत्याचा वावर हा एवढा वाढला आहे कि सत्य हवेत विरले असंच जाणवतं आहे. अर्धसत्या मुळे सत्य दुर्लक्षित होत आहे हे वास्तव विसरता येणार नाही.**

आज आपण हवेत आहेत पण आपण अर्धसत्यावर स्वार होऊन कुठे पोहचु हे आपल्याला पण समजणार नाही. कल युगात अर्धसत्याचा एवढा मोठा प्रचंड बोलबाला निर्माण झाला आहे कि सत्य पार झाकाळुन गेलं आहे आणि अर्धसत्य हे हेच स्वतःला सत्य म्हणून भासवून सगळीकडे मिरवत आहे.विशेष म्हणजे बहुतांश लोक सुद्धा अर्धसत्यालाच सत्य माणुन तेच अर्धसत्य इतरांना एवढ्या आविर्भावात पटवतात कि असत्याला सुद्धा हसु आवणार नाही. म्हणजे आपण आपली स्वतःची व पर्यायाने इतरांची फसवणूक करतोय. मराठीत याला स्वतःच्या पायावर स्वतः दगड मारणे असं पण संबोधलं जातं.असत्य हे आपल्याला निश्चित महित असतं म्हणून आपण फसत नाहीत.अथवा त्या मार्गाने धावत नाहीत त्या अनुषंगाने आपला महत्वपूर्ण वेळ व्यर्थ वाया जात नाही. पण अर्धसत्य हे दिसण्यासाठी कल्पक भ्रमक असतं पण अंतिमतः भ्रमनिरास करणार ठरत.नुकसानदायी ठरत .सत्य रोचक असतं असत्य हे निश्चित असतं व अर्धसत्य हे भ्रमक असतं .आपल्याला जे निश्चित महित आहे तिथं आपला व्यर्थ वेळ वाया जात नाही.पण जे आपण सत्य समजतो आणि त्या दिशेने धावतो .धावत धावत खुप दुर पर्यंत पोहचल्यावर आपल्याला समजतं आपण अर्धसत्य मार्गावर मार्गक्रमण करत आहेत.मग आपल्याला खूप मोठा पश्चात्ताप करावा लागतो.वास्तवा ऐवजी भ्रमक कल्पनेत फिरणं म्हणजे अर्धसत्य स्वीकारणं असत्य हे आपल्याला अगोदर माहित असतं हे असत्य आहे.पण अर्ध सत्याला आपण सत्य समजतो आणि खूप प्रचंड दुर गेल्यानंतर आपल्याला समजतं हे अर्धसत्य आहे म्हणून मग तिथुन परत फिरण जवळपास आपल्यासाठी अशक्य प्राय असतं .आशा वेळी असत्या मुळे जितकं आपलं नुकसान होत नाही किंबहुना त्या पेक्षा हि जास्त नुकसान हे अर्धसत्या मुळे होत . म्हणून हे खूप घातक आहेच.आपण ज्या क्षेत्रात कार्य करतोय त्या क्षेत्रातील असो कि जीवनाशी निगडित इतर सर्व क्षेत्रातील आपणं जेव्हा अर्धसत्याची शिकार होतो . तेव्हा आपलं स्वतःचं आपल्या सहवासातील इतरांच तसंच आपल्या पुढच्या पिढीच भरून निघणार नाही एवढं नुकसान होत.जे असत्या पेक्षा हजारो लाखो पटीने जास्त असतं.सत्य व असत्य या दोन्ही मध्ये असणारा फरक आंतर आपण त्या क्षणी ओळखतो कारण सत्य व असत्य हे परस्परविरोधी टोक असल्याने त्यांची निश्चित अशी रूपरेषा असते आणि ती ठळकपणे समजते .पण अर्धसत्य हे तसं नाही पाहताना ऐकायला ते सत्य पेक्षा हि सुंदर दिसत .पण उपयोग क्षणी त्यांचा फायदा होत नाही तर खुप मोठा तोटा होतो. म्हणून अर्धसत्य हे आपल्यासाठी आपल्या भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी घातक आहे निरुपयोगी आहे. अहितकारक आहे . त्यापासून आपण वेळीच जागृत होणं गरजेचं आहे स्वतःला सावरुन सावध ठेवण हे तितकेच महत्त्वाचे आहे. असत्य जितकं आपलं नुकसान करू शकत नाही त्या पेक्षा जास्त नुकसान अर्धसत्य घडवून आणत.दिशा हिन असत्या पासून आपणं सतर्क असलं पाहिजे तरच आपलं हित होईल अन्यथा आपणच आपलं अहित करू या मध्ये शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चंद्रपुरातील बॉटनिकल गार्डन महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : 1667 कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर्च :** चंद्रपूरला आजही 'चांदा' या नावाने ओळखले जाते. आज येथे 1667 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण होत असल्याने चांदाची खऱ्या अर्थाने चांदी आहे. येथील बॉटनिकल गार्डन हे जागतिक दर्जाचे असून महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. चंद्रपूर येथे बॉटनिकल गार्डनचे लोकार्पण, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञान संकुलाचे भूमिपूजन तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर राज्याचे वने सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार अशोक नेते, आमदार किशोर जोरगेवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक महीप गुप्ता, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू उज्वला चक्रदेव, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, डॉक्टर जितेंद्र रामगावकर, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते. पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी वनसंपदा वाढविणे गरजेचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, येथील बॉटनिकल गार्डन हा राज्यासाठी एक आदर्श प्रकल्प आहे. चंद्रपुरात सर्वोत्तम गार्डन होण्यासाठी पालकमंत्री मुनगंटीवार पुढाकार घेतला. पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय आकर्षक असे हे बोटॅनिकल गार्डन तयार झाले असून लोकांचा याकडे कल वाढेल. शैक्षणिक क्षेत्रात महर्षी कर्वे हे मोठे नाव आहे. त्यांनी स्थापन केलेल्या एसएनडीटी विद्यापीठाचे उपकेंद्र चंद्रपुरात होत आहे, येथील महिला व तरुणींसाठी ही अतिशय आनंदाची बाब आहे. सोबतच केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा प्रकल्प आणि मलनिस्सारण प्रकल्प हे सुद्धा विकासाचे मोठे काम चंद्रपुरात होत आहे, याचा आनंद आहे. पुढे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, चंद्रपूरला दूरदृष्टी असलेले सुधीरभाऊ सारखे लोकप्रतिनिधी लाभले आहे. हाती घेतलेले काम पूर्ण शक्तीनिशी करणारे ते मंत्रिमंडळातील माझे वरिष्ठ सहयोगी आहेत. गतकाळात अर्थमंत्री तसेच यावेळी वनमंत्री व सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून त्यांनी राज्यासाठी खूप मोठे काम केले आहे. त्यांच्या उपक्रमशीलतेमुळे वन खाते व सांस्कृतिक खाते बहरले आहे. आपल्या संस्कृतीची जोपासना कशी करायची, हे सांस्कृतिक कार्य विभागाने दाखवून दिले आहे. प्रत्येक विषयाची जाण असलेल्या सुधीरभाऊंनी जिल्ह्यात विकासाची गंगा आणली, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### पर्यटनासाठी पुढील तीन महिने बॉटनिकल गार्डन मोफत : सुधीर मुनगंटीवार

वाघाच्या प्रेमापोटी या व्याघ्रभूमीत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बॉटनिकल गार्डनचे आज लोकार्पण करण्यात आले . पुढील तीन महिने पर्यटनासाठी बोटॅनिकल गार्डन मोफत असेल, अशी घोषणा राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली . चंद्रपूर मध्ये नुकताच झालेला ताडोबा महोत्सव हा जागतिक दर्जाचा ठरला असून 20 कोटी लोकांपर्यंत ताडोबा महोत्सव पोहोचला आहे . तसेच ॲडव्हाँटेज चंद्रपूर मध्ये विविध उद्योगांचे 75 हजार कोटींचे सामंजस्य करार येथे करण्यात आले आहे . मोठ्या प्रमाणात चंद्रपूर मध्ये उद्योगांनी गुंतवणूक केली असून पुढील दहा वर्षात येथील बेरोजगारी संपुष्टात येईल . आज चंद्रपूर मध्ये एसएनडीटी विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी 590 कोटी, बॉटनिकल गार्डनचा पहिला टप्पा 264 कोटी, महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना 270 कोटी आणि मलनि :स्सारण प्रकल्प 570 कोटी अशा एकूण 1667 कोटी रुपयांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते चंद्रपुरात आज करण्यात आले . निवडणुकीनंतरही चंद्रपुरातील कॅन्सर हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र सैनिक स्कूल आदींचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा चंद्रपूरला यावे, असे आवाहनही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले . तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे चारही प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले . कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून राज्यगीताने सुरुवात करण्यात आली . कार्यक्रमाचे प्रास्तावित जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले .

# अंबाझरी जैवविविधता उद्यानात वणवा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वनखात्याच्या अखत्यारितील अंबाझरी जैवविविधता उद्यान गेल्या दोन दिवसांपासून आगीत धूमसत आहे. मंगळवारी दुपारच्या सुमारास या उद्यानाला आग लागली. महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या सहकार्याने ती विझवली, पण पुन्हा बुधवारी त्याचठिकाणी आगीचा भडका उडाल्याने या उद्यानाविषयी अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. अंबाझरी जैवविविधता उद्यानात मंगळवारी दुपारच्या सुमारास वणवा लागला. यात मोठ्या प्रमाणावर जंगलाची हानी झाली. महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे सुमारे सात बंब घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, हवेमुळे तुकड्यातुकड्यांमध्ये आग दिसून येत होती. सायंकाळी उशिरा आग पूर्णपणे आटोक्यात आली. या वणव्यात सुमारे १५ हेक्टर जंगल जळाल्याचा अंदाज वनखात्याने व्यक्त केला. प्रत्यक्षदर्शींच्या मते, त्यापेक्षा अधिक म्हणजे ६० ते ७० हेक्टर जंगल जळाले. अंबाझरी जैवविविधता उद्यानात दरवर्षी उन्हाळ्याच्या सुरुवातीला आणि उन्हाळ्यात जंगल जळते. कधी शॉर्टसर्किटचे कारण दिले जाते, तर कधी लगतच्या परिसरातून आग उद्यानात आल्याचे सांगितले जाते. २०२१ साली लागलेल्या वणव्यात सर्वाधिक २५० हेक्टर जंगल जळाले होते. वनखात्याने यात दहा ते १५ हेक्टर जंगल जळाल्याचे सांगितले असले तरीही प्रत्यक्षदर्शींच्या मते ६० ते ७० हेक्टर जंगल वणव्यात राख झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# अट्टल गुन्हेगार मयूर जोशीला सापळा रचून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर परिसरासह जिल्ह्यात आपली दहशत निर्माण करणाऱ्या अट्टल गुन्हेगार मयूर शाम जोशी रा.पहूर कसबे यास दि.१२/३/२४ रोजी पहूर पोलीसांनी सापळा रचून शिताफीने अटक केली . जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनला त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता वेळोवेळी उल्लंघन करून दाखल असलेल्या खटल्याकामी न्यायालयात उपस्थिती देत नव्हता. जिल्हा न्यायाधीश वर्ग-१ व अतिरिक्त सत्र न्यायालय जळगाव यांचे कडील खटला क्र.१२२/२०१९ मधील अट्टल गुन्हेगार आरोपी मयुर शाम जोशी रा.पहूर कसबे ता.जामनेर याचे नावे NBW अजामीन पात्र पकड वारंट न्यालायाने काढले होते.त्यानुसार आदेशाची अंमल बजावणी करण्यात येऊन पहूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सचिन सानप यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी त्याच्यावर पाळत ठेवीत सापळा रचून शिताफीने अटक केली.



आरोपी मयुर शाम जोशी या अट्टल गुन्हेगारावर मुक्ताईनगर पोलीस स्टेशन, जिल्हापेठ पोलीस स्टेशन जळगाव, रामानंद पोलीस स्टेशन जळगाव इ. पोलीस स्टेशनात गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यासह त्याच्यावर पहूर पोलीसांकडून कारवाई करण्यात येऊन जिल्हा सत्र न्यायालयासमोर दि.१२मार्च २०२४ रोजी हजर करण्यात आले.जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानूसार आरोपी मयूर जोशी याची जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. पहूरसह परिसरात उपद्रव माजवणारा आरोपी मयुर जोशी याला अटक केल्याने पहूर पोलीसांचे कौतुक होत आहे.

# 'तुझ्यासाठी काहीही...' मराठी चित्रपटाचा आतंरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** संकल्प कर्मण्या चित्र निर्मित कल्पना संजय गायकवाड( मुखेडकर )यांनी निर्माण केलेला अवयव दाना वर आधारीत पहिलाच मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, दि ग्रँड सिने कार्निवल, मालदीव येथे उत्कृष्ट अभिनेता डॉ. संजय माधवराव गायकवाड मुखेडकर यांना दि इंडी मूवी स्पार्क फिल्म फेस्टीवल, नेदरलँड्स,येथे उत्कृष्ट अभिनेता , दि वुमेन्स बायोस्कोप, न्यू दिल्ली , येथे उत्कृष्ट निर्माती कल्पना यांना , पराई आतंरराष्ट्रीय संगीत चित्रपट महोत्सव, तिरुअनंतपुरम येथे , ग्रीष्मात कसा वसंत फुलला या गाण्यासाठी उत्कृष्ट गीत, ( गीत, संगीत डॉ.संजय यांनी दिले आहे ) , ब्ल्यू बर्ड फिल्म फेस्टीवल,



कोलकता येथे उत्कृष्ट अभिनेता डॉ. संजय यांना देवून गौरविण्यात आले आहे. अजुन अनेक आंतरराष्ट्रिय चित्रपट महोत्सवाचा निकाल येणे बाकी आहे. मागच्या वर्षी याच चित्रपटासाठी ऑस्कर पुरस्कार 2023 उतकृष्ट अभिनेता डॉ. संजय, उत्कृष्ठ गीत, संगीत,लेखन, साठी पात्र ठरला होता. हा चित्रपट फुल्ल करमणूक, गीत संगीत ने ओतप्रोत भरलेला, फाईटिंग व सामजिक संदेश देणारा आहे. या चित्रपटात डॉ. संजय यांनी मूकबधिर मुख्य भूमिका उत्कृष्टपणे वठवली आहे.आतापर्यंत हा चित्रपट लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया, अमेरिका , प्लाझा थिएटर, मुंबई, व नांदेड येथे दाखविण्यात आला आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या आग्रहास्तव पुनश्च एकदा जवळच्या चित्रपट गृहामध्ये येणार आहे. निर्माती _ कल्पना कथा, पटकथा, गीत, संगीत, दिग्दर्शक, मुख्य भूमिका _ डॉ. संजय इतर कलाकार _ कर्मण्य, हिमानी पाठक, इशियाना कौर , डॉ. दीनबंधू शेळके, फोटोग्राफर संकल्प मुखेडकर यांचे आहे.



जिल्ह्यात ज्वारी पिकाची काढणी उरकत आल्याने कडबा पावसाने भिजू नये तसेच पावसाळ्यात चारा म्हणून जनावरांना उपयोगी पडावा याकरिता गंज रचण्याची लगबग बळीराजाकडून सुरू आहे. भूम, परंडा, कळंब, वाशी, पारगाव, ढोकी, तेर, धाराशिव, तुळजापूर व जिल्ह्यातील इतर भागातील शेतकऱ्यांनी गेल्या चार महिन्यांपापूर्वी रब्बी हंगामात पेरणी केलेली ज्वारी पिकाची काढणी व कणसाची मळणी झाल्यानंतर कडब्याच्या पेंड्या बांधून त्या टॅक्टर किंवा बैल गाडीमधून गोठ्याजवळ आणून गंज रचायची कामे वेगाने सुरू आहेत. छायाचित्र : सचिन कोरडे




## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६९वे



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

श्री महाराज समजावती । तळमळीने साऱ्यांना सांगती ।
सावध सूचना करिती । आपुल्या भक्तांना ।।१ ।।
श्री महाराजांचे शब्द समजुनी घ्यावे । त्यातले सार ही
जाणुनी घ्यावे । मना सांगावे । आचरण करण्या ।।२ ।।
दोन वाटसरूबाबत असे घडले । श्री महाराज रात्री बाहेर पडले।
तो हे दोघे दिसले । निजू नका रे इथे, म्हणती त्यांना महाराज ।। ३ ।।
ते एकाने ऐकले । दुसर्याने नाही ऐकले । पावसात रात्री
ते जुने घर पडले,। दुर्दैवी दुसरा मरण पावला ।।४ ।।
एक बोध यातुनी घ्यावा । शब्द सत्पुरुषांचा आज्ञाप्रमाण समजावा ।
प्रारब्ध भोग जरी लागे भोगावा । परिणाम भोगाचा ताप ना देई ।। ५ ।।
प्रारब्ध ,बुद्धी कुंठित करी । भोग समयी जरी । आज्ञापालन करी ।
सत्पुरुष शब्दांचे ।। ६ ।।साधन हे उत्तम । सुधारते त्यामुळे कर्म ।
हेचि जाणावे मर्म। सत्पुरुषांचा आज्ञेचे ।। ७ ।।

# अम्माचा आशीर्वाद मिळाला, आता नव्या ऊर्जेने काम करणार

## मुख्यमंत्री : अम्मा का टिफिन उपक्रमाचे केले कौतुक

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** अम्माने सुरु केलेला अम्मा का टिफिन हा उपक्रम राज्यात चर्चेत आहे. अम्माने सुरु केलेले काम राज्यासाठी प्रेरणादाई आहे. अनेकदा किशोर जोरगेवार आपल्या मातोश्री बद्दल कुतुहलाने सांगत असतात आज अम्माची भेट घेता आली. त्यांचा आर्शिवाद घेऊन मुंबईला जात आहे. आता नव्या उर्जेने काम करणार असे वक्तव्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चंद्रपूर दौ-यावर असतांना त्यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी पोहचत अम्माची भेट घेतली. 2022 ला "मदर हु इंस्पायर पुरस्काराने अम्मांला सन्माणीत करण्यात आले होते. तेव्हा मुख्यमंत्री यांनी व्हिडीओ कॉल वरुन शुभेच्छा दिल्या होत्या. तेव्हा अम्माने त्यांना घरी येण्याचे आमंत्रण दिले होते. त्यामुळे आज अम्माच्या भेटीला आलो असल्याचे म्हणाले. मुख्यमंत्री सचिव विकास खारगे, विदर्भ संपर्क प्रमुख किरण पांडव, जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन आदींची उपस्थिती होती.

चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांच्या मातोश्री गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार यांचा अम्मा का टिफिन हा उपक्रम राज्यभर चर्चीला जात आहे. सदर उपक्रमाअंतर्गत शहरातील गरजवंताना दररोज घरपोच जेवनाचा डब्बा पोहचविला जात आहे. या कुटुंबासाठी अम्मा आधार ठरली आहे. त्यांच्या या उपक्रमाबदल अनेक संस्थानच्या वतीने त्यांना सन्माणीत करण्यात आला आहे. 2022 साली त्यांना केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते मदर हु स्पा इंस्पायर पुरस्काराने सन्माणीत करण्यात आले. याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉल करुन अम्माला शुभेच्छा दिल्या होत्या. यावेळी अम्माने त्यांना भेटीसाठी चंद्रपूरात आमंत्रित केले होते. दरम्यान आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चंद्रपूर दौ-यावर असतांना त्यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी पोहचत अम्माची भेट घेतली आहे. यावेळी अम्मा का टिफिन या उपक्रमाची त्यांनी पाहणी करत माहिती जाणून घेतली. हा एक अभिनव सामाजिक उपक्रम असुन राज्याला यातुन प्रेरणा मिळेल. या उपक्रमाबद्दल अनेकदा ऐकल होत. आज भेट देता आली याचा आनंद होत असल्याचे ते यावेळी म्हणाले.



# रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे जागतिक महिला दिवस उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित जागतिक महिला दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मा. रूपाली कोंडेवार-मोरे (दूरचित्रवाणी अभिनेत्री, सुपरीचित निवेदिका), मा. आरती वाझे आणि करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा.सायली लाखे पिदळी हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता सरस्वती आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संगीत विभाग प्रमुख प्रा. सचिन देशमुख आणि प्रा. हर्षल रोठे यांच्याद्वारे स्वागत गीत सादर करण्यात आले. आपल्या इतिहासात हिरकणी सारखी एक आई होऊन गेली जी स्वतःच्या बाळाच्या प्रेमापोटी रायगडाचा उभा कडा उतरून आली, आपल्याला कर्तबगार स्त्रियांच्या कर्तुत्वाचा वारसा लाभलेला आहे, आपल्यातील जिद्द आणि आत्मविश्वास कायम ठेवा असे वक्तव्य मा. रूपाली मोरे यांनी व्यासपीठावरून व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतीक्षा बोपचे (बी.ए तृतीय वर्ष) सानिका नारे हीने महिला दिनाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले. तर, सूत्रसंचालन दीक्षा माने (द्वितीय वर्षे) हीने केले. आभार लतिशा ककोडिया (बी.ए प्रथम वर्ष) हीने मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सायली लाखे पिदळी यांनी या दिनाचे औचित्य साधून करिअर कट्टाच्या खास विद्यार्थिनींसाठी असणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव मा. मारोती वाघ आणि संचालिका मा.सौ. लता वाघ मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यक्षीय मनोगत मा. आरती वाझे यांनी मांडले. कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# जिंतूर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** नगरपरिषद अंतर्गत शहराला तीन ते चार दिवसात होणारा पाणीपुरवठा सध्या आठ ते दहा दिवसाला होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतोय याबाबत अनेक वेळा नगरपालिका प्रशासनाला लेखी निवेदने दिली मात्र या निवेदनाची प्रशासनाकडून कसलीही दखल घेण्यात आली नसल्यामुळे संभाजी ब्रिगेड च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिनांक 11 मार्च रोजी देऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,नियमित कर भरणा करून देखील जिंतूरकरांना सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे आठ ते दहा दिवसात पाणीपुरवठा होत असल्याने त्याप्रमाणेच कर आकारला जावा, तसेच जिंतूर शहरात जागोजागी मोकळ्या प्लॉटवर व जागोजागी कचरा पडलेला आहे. तो कचरा तात्काळ साफ करण्यात यावा. तसेच शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे तालुका अध्यक्ष अँड माधव दाभाडे,दामोदर नवले,संजय गायके,सौरभ चव्हाण, भागवत चव्हाण, ऋषिकेश कामखेडे,निशांत चव्हाण, प्रितम वाकळे यांच्यासह नागरिकांच्या सह्या आहेत.

# पोंभुर्णा येथील वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिरात 751 रुग्णांची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ग्रामीण भागातील आदिवासी व बिगर आदिवासी जनतेला तालुका स्तरावर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने सार्वजनिक आरोग्य विभाग चंद्रपूर आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते दूरचित्रवाणी द्वारे करण्यात आले. यावेळी तालुक्यातील 751 रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोंभुर्णाच्या नगराध्यक्षा सुलभा पिपरे तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, डॉ. मंगेश गुलवाडे, विनोद देशमुख, अलका आत्राम अजय मस्के आदी उपस्थित होते. आरोग्य शिबिरामध्ये एकूण 751 रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी 2 मुख कर्करोग, 10 हायड्रोसील, 1 हर्निया, 29 मोतीबिंदूचे रुग्ण मिळाले. सदर रूग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव यांनी केले. संचालन भाग्यश्री भालेराव यांनी तर आभार निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके यांनी मानले. शिबिराकरीता शरद पवार दंत महाविद्यालय सावंगी मेघे, वर्धा, जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि ग्रामीण रुग्णालय, पोंभुर्णा येथील अधिकारी कर्मचा-यांनी सहकार्य केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, तहसीलदार शिवाजी कदम, पोलिस निरीक्षक संजय सिंह, नगर पंचायत मुख्याधिकारी विकास चिडगलवार, संवर्ग विकास अधिकारी अरुण चनफने, बालविकास अधिकारी अमित लाडे, सागर खडसे, सचिन धोंडरे आदी उपस्थित होते.




# महिला सुशिक्षित व सक्षम झाल्यास सुसंस्कारित पिढी घडते : डॉ. स्वातीताई वाकेकर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** मुली ह्या चुलीपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत, पुरुषांपेक्षा महिलांच्या सुशिक्षित पणाचे प्रमाण अधिक आहे. राष्ट्रपतीच काय? पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यपाल, पोलीस महासंचालक, मोठमोठ्या शास्त्रज्ञ पदावर सुद्धा महिलाच आहेत. याचा आम्हा महिलांना सार्थ गौरव असायला हवा.एक महिला सुशिक्षित ,संस्कारित झाली की ती शेकडो महिलांना सुशिक्षित व सुसंस्कारित करते. महिला सुशिक्षित व संस्कारीत झाल्यास सुसंस्कारित व सुशिक्षित पिढ्या घडतात", असे प्रतिपादन प्रदेश कॉंग्रेस सचिव डॉ. स्वाती वाकेकर यांनी केले. त्या दिनांक १० मार्च रोजी कृषी विज्ञान केंद्राच्या उमादेवी सभागृहात सन्मान नारी शक्तीचा ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. व्हिडिओ हॉलिंटयर्स ,व्हॉईसऑफ मिडिया आणि फुले ,शाहू ,आंबेडकर विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या यामिनी चौधरी पुणे ह्या कार्यक्रमाच्या उद्घाटक होत्या तर शास्त्र युवा संघर्ष वाहिनी नागपूरच्या शुभदाताई देशमुख, सामाजिक कार्यकर्त्या अमृता सुनीता आनंद गोवा यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.ॲड.ज्योतीताई ढोकने, माजी जि प सदस्य सौ स्मितल पाटील, माजी जि प सदस्य सौ पूजाताई अवचार,सौ विद्याताई राजपूत, रजनी जवरे ,जिजाताई राठोड,सौ गंगुबाई दामोदर यांची सुद्धा व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या उद्घाटक यामिनीताई चौधरी, शुभदा देशमुख यांनी यावेळी महिलांना प्रदीर्घ मार्गदर्शन केले. व्हिडिओ वॉलेंटियर्सचे विनोद वानखडे यांनी प्रास्ताविकामध्ये प्रायोजनाबद्दल ची दिशा विशद केली. शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, महिला बालविकास क्षेत्रात, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुमारे ५० भगिनींचा ह्यावेळी सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात आला. आता गावागावातच नव्हे तर घराघरात क्रांतीज्योती सावित्री, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई, माता रमाई ह्या जन्माला येणे आवश्यक आहे.



# खोदून ठेवलेल्या रस्त्याचे काम सुस्त, रिसोडवासी त्रस्त

## ठेकेदाराचा हलगर्जीपणा शहरवासियांच्या मुळावर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून ओळख असलेले रिसोड शहर तालुकावासियांसह नजीकच्या मराठवाड्यातील लोकांची मुख्य बाजारपेठ आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाटा हा शहरातील मुख्य रस्ता आहे. सदर रस्त्याचे काम सुरू असून त्यानिमित्ताने संबंधीत ठेकेदाराने रस्त्याचे खोदकाम केले आहे. मात्र पुढील काम थंडबस्त्यात पडून सुस्त झाले आहे. परिणामी रिसोडवासियांसह बाजारासाठी येणारे नागरीक त्रस्त झाले आहेत. यानिमित्ताने ठेकेदाराचा हलगर्जीपणा शहरवासियांच्या मुळावर बेतला असल्याची ओरड होत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ असलेला रस्ता मालपणी या ठेकेदाराने एका महिन्यापासून खदुन ठेवला व रस्त्याचे काम कासव गतीने चालू आहे. हा रस्ता मुख्य बाजारपेठेमध्ये आहे, या रस्त्याच्या दोन्ही कडेला दुकाने आहेत. तसेच नगरपरिषद गाळे आहेत भाजी मंडी आहे, जीवन आवश्यक वस्तूंच्या दुकान आहेत. हा रस्ता खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना



मोठ्या प्रमाणात ये जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. व दुकानांमध्ये धूळ उडत आहे. या रोडवर माती मिश्रित मुरूम टाकण्यात आले. या रोडवर कोणत्या प्रकारची दबाई किंवा पाणी टाकण्यात येत नाही. पाणी टाकले तर थातुर मातुर पाणी टाकत येत आहे. आजूबाजूच्या दुकानदारांच्या दुकानात धुळ उडत असल्यामुळे दुकानदार त्रस्त झालेले आहेत, हे काम लवकरात लवकर करण्याची मागणी व्यापाऱ्यांरी वर्गाकडून होत आहे. मात्र हा ठेकेदार उटावरूनतर घोडे राखत आहे. हा ठेकेदार कशा पद्धतीने काम चालू आहे हे सुद्धा पाहण्याकरिता आला नाही. व्यापारी वर्गाकडून मागील कित्येक



शितला देवी ते लोणी फाटा हा रोड प्रभाग क्र .सहा या माझ्या प्रभागात येत आहे . त्यामुळे वारंवार ठेकेदारांना सांगून सुद्धा ठेकेदार मनमानी कारभार करतो ,व त्यामुळे नागरिकांना व दुकानदारांना त्रास सहन करावा लागत आहे . या रोड चे एक साईटने काम चालू करावे व इस्टिमेट मध्ये ज्या पद्धतीने दिलेल आहे त्या पद्धतीने काम करावे कामात कुठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा करू नये व निकृष्ट दर्जाचे काम करू नये याची पाहणी व दखल बांधकाम विभागाने घ्यावी . बांधकाम विभागाने या रोडचे काम चालू असताना लक्ष देण्याची गरज आहे . मात्र तसे होताना दिसत नाही . मुख्याधिकारी यांना काम चुकीच्या पद्धतीने व कासव गतीने चालू आहे याची तक्रार सुद्धा देण्यात आली आहे .

**सौ . मीराताई संतोष चऱ्हाटे, ( नगर सेविका, रिसोड )**

वर्षापासून हा रस्ता करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती. हा रस्ता चालू झाला मात्र या रस्त्याचे काम कासव गतीने सुरू असल्याने ठेकेदाराच्या हलगदी पणामुळे व्यापारी वर्गाला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कासवगतीने काम चालू केल्यामत्यामुळे मुख्याधिकारी यांना नगरसेविका मीरा संतोष च-हाटे यांनी तक्रार देऊन नगरपरिषदेने जो इस्टिमेट तयार केला होता, त्या इस्टिमेटच्या हिशोबाने काम लवकरात लवकर करावे व कामात कोणतेही हलगर्जीपणा करू नये व नागरिकांना याचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, याकरिता तक्रार सुद्धा देण्यात आली आहे.

बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी करावी व संबंधित ठेकेदार मालपाणी याला लवकर काम चालू करण्याकरिता आदेश द्यावा व बांधकाम विभागाने इस्टिमेटच्या हिशोबाने काम करून घ्यावे व इस्टिमेट मध्ये जे काम आहे, त्या पद्धतीने काम करावे. इस्टिमेटमध्ये शितलादेवी ते लोणी फाटा असे असून ते काम त्या पद्धतीने करावे अशी मागणी सुद्धा करण्यात आली. जर हे रोड एका साईडने चालू केले कोणालाही त्रास होणार नाही व रहदारी सुद्धा एका साईडने चालू राहील पण असे होत नाही. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराने हा रोड दोन्ही साईटने खोदून टाकला आहे.



# संत ज्ञानेश्वर माऊली निराधार बालक आश्रमात महिला सन्मान सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** धाराशिव मतदार संघाचे आ.कैलास (दादा) घाडगे पाटील यांच्या पत्नी सौ.शुभांगी कैलास घाडगे पाटील,शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.वर्षा पंडित जाधव,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या कळंब शहर महिला अध्यक्षा सौ.धनश्री रुपेश कवडे,डिकसळ ग्रामपंचायत माजी सरपंच अनुराधा हरिभाऊ कुंभार,ह.भ.प सुनिता आडसूळ महाराज यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये सन्मान सोहळा संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांपैकी.सौ.शुभांगी घाडगे पाटील,प्रा.डॉ.वर्षा जाधव व सौ.धनश्री कवडे यांनी मनोगत व्यक्त करताना प्रत्येक पुरुषाच्या पाठीमागे स्त्रीचा हात असल्याशिवाय पुरुष यशस्वी होऊ शकत नाही असे उदगार काढून राष्ट्र उभारणीत महिलांचे योगदान सांगून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके यांनी महापुरुष,राष्ट्रसंत आणि राष्ट्रमातांच्या योगदानामुळे आपण आज स्वतंत्र असून सध्याच्या परिस्थितीत आपले स्वातंत्र्य, लोकशाही आणि संविधान धोक्यात आले आहे ते टिकवण्यासाठी भारत जोडो अभियानात भजनी मंडळांनी सहभागी होवून भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करावे असे आवाहन केले. प्रस्तावनेतून माधवसिंग राजपूत यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद करून प्रबुद्ध रंगभूमीने महिला कलावंतांचा केलेला सन्मान कौतुकास पात्र असल्याचे सांगितले.

ह.भ.प महादेव महाराज यांनी संस्थेचे कार्य विषद करून कलावंतांच्या मानधनासाठी या प्रमाणपत्राचा खूप मोठा फायदा असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपातून सौ.सरस्वती आडसूळ यांनी जागतिक महिला दिनानिमित्त प्रबुद्ध रंगभूमीने केलेला सन्मान हा प्रेरणादायी असून महिलांनी आपल्या कलेच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अविनाश घोडके व बंडू ताटे यांनी केले तर संत सुफी शमशोद्दीन सय्यद यांनी सर्व भजनी मंडळातील महिलांनी आपले सन्मानपत्र फ्रेम करून दर्शनी भागावर लावावे जेणेकरून राष्ट्रसंत,महापुरुष आणि राष्ट्रमातांची प्रेरणा मिळत जाईल असे सांगून सर्वांचे आभार मानले. या महिला सन्मान सोहळ्याला प्रतिसाद मिळाला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार राजेंद्र बारगुले,महेश फाटक,विशाल पवार यांनी परिश्रम घेतले.

# वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे या नामांकित संस्थेच्या विश्वस्तपदी नरेंद्र घुले पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे या नामांकित संस्थेच्या विश्वस्तपदी नेवासा तालुक्यातील भेंडे येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व मार्गदर्शक माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

श्री ज्ञानेश्वर साखर कारखाना कार्य स्थळावर नरेंद्र घुले पाटील यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस माजी सरपंच गणेशराव गव्हाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे, नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ.शिवाजीराव शिंदे, ज्ञानेश्वरचे विद्यमान संचालक अशोकराव मिसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

नरेंद्र घुले पाटील यांच्या झालेल्या निवडीबद्दल त्यांचे श्री ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे संचालक माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, संचालक माजी आमदार पांडुरंग अभंग, जेष्ठ संचालक ॲड. देसाई देशमुख,काशिनाथ नवले, काकासाहेब नरवडे, दिलीपराव लांडे,प्रभाकर कोलते, भैय्यासाहेब देशमुख, रामदास गोल्हार यांनी अभिनंदन केले आहे.



# ओंकारनगर शाळेत बाल आनंद मेळावा

## विक्रेते झालेल्या विद्यार्थ्यांनी कमावले १५,००० रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महानगरपालिकेच्या केडगाव येथील प्रथम आयएसओ मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत आयोजित बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विक्रेते बनत खरेदी विक्रीचा अनुभव घेत १२,००० रुपयांची कमाई केली. पाणीपुरी, पापडभाजी, वडापाव, भेळ,समोसे, मसाला ताक, ॲपल शेक, कस्टर्ड, चकली, पापडी चाट, ढोकळा, लिंबू शरबत, शेंगदाणा लाडू, नाचणी लाडू, इडली चटणी, रोझ शरबत, ब्रेड पॅटीस, चकली, कोथिंबीर वडी, लस्सी, डाळीचे लाडू, मंच्युरियन, भाजीपाला इत्यादी पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने लावले होते. उपस्थित विद्यार्थी, पालक, नागरिक यांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर भेट देत खरेदीचा मनसोक्त आनंद लुटला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप पठारे होते. भैरवनाथ सायकलचे सोमनाथ बनकर, नगरसेवक अमोल येवले, अनिल हिवाळे,मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा लक्ष्मी काळे, सेक्रेटरी रेश्मा चारनिया,केडगावचे



सबपोस्ट मास्तर संतोष यादव, सप्तरंगचे नंदेश शिंदे,नंदा यादव, वैजयंती जोशी,मंगेश पाटेकर, मुख्याध्यापक अक्षय सातपुते, विजय घिगे, अमोल बोठे, अरुण पवार, महानगर न्यूजचे विक्रम लोखंडे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी,सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे यावेळी उपस्थित होते. भैरवनाथ सायकल सेंटर केडगावचे सोमनाथ बनकर यांनी स्वरांजली लोळगे या विद्यार्थीनीला सायकल भेट दिली. तसेच इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने महिला पालकांची मोफत हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री,नफा-तोटा समजावा, विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढावे, गतीने आकडेमोड करता यावी,नाणी-नोटा यांचा व्यवहार समजावा म्हणून शाळेत दरवर्षी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येते असे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले. महानगरपालिका शाळांमध्ये दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या कौशल्यांचे शिक्षण बालवयातच दिले जाते याचा विशेष आनंद आहे.तसेच ओंकारनगर शाळेत सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जातात,असे अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रदीप पठारे आपल्या मनोगतात म्हटले. यावेळी नगरसेवक अमोल येवले, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा लक्ष्मी काळे यांनीही आपल्या मनोगतातून ओंकारनगर शाळेतील चिमुकल्यांचे व शाळेतील शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले.

# श्री ऋषी महाराज संस्थान महालब्धा येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील महालब्धा संस्थान येथे विश्वशांती, विश्ववकल्याण, मानवी जिवनाचा आत्मओध्वआर, लोकशिक्षण, जनजागृती, समाजप्रबोधन व समाज निर्मितीसाठी आणि आदर्श गावांचा संकल्प श्रमशक्तीद्वारे, ग्रामविकासाकरिता मार्गदर्शक तथा गुरुवर्य ह.भ.प. संजय महाराज पाचपीर ,ह.भ.प.शंकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि.११/३/२४ ते १८/३/२४ जय गजानन ग्रुप व समस्त ग्रामस्थ मोलखेडा व महालब्धा यांच्या वतीने श्री ऋषी महाराज संस्थान श्रीक्षेत्र ऋषीगढ महालब्धा येथे करण्यात आले आहे. तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थाच्या वतीने कथा प्रवक्ते संदीपजी महाराज सांगळे ऋषीगढ यांनी केले आहे.श्रीमद भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प.संदीपजी महाराज आहेत.श्री ऋषी महाराज संस्थान भाविक भक्त नेहमीच समाज प्रबोधन, सामाजिक कार्य असो की धार्मिककार्य असो प्रत्येक कार्यात निस्वार्थपणे, हिरीरीने भाग घेऊन ते कार्य यशस्वीपणे पार पाडत असतात. अनेक धार्मिक उपक्रम यशस्वी करून दाखविले आहेत. समाज प्रबोधन करणेसाठी ह.भ.प.शुभम महाराज कोटमे आळंदी देवाची,ह.भ.प.तुकाराम महाराज मेहूनकर श्री मुक्ताई संस्थान ,ह.भ.प.समाधान महाराज पगार आळंदी देवाची, ह भ.प.माऊली महाराज काकडे आळंदी देवाची,ह.भ.प.महादेव महाराज निपानेकर निपाना,ह.भ.प.युवराज काका देशमुख आळंदी देवाची, ह.भ.प.गंगाधर महाराज गोळेगांवकर जळगाव जामोद,ह.भ.प.गुरुवर्य राजेश्वरनंदगिरीजी महाराज यांचे सकाळी ९ ते १२ काल्याचे कीर्तन, होईल त्यानंतर भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे जय गजानन ग्रुप व समस्त ग्रामस्थ मोलखेडा यांच्याकडून आयोजन करण्यात आले आहे. यांच्या कडून करण्यात आले आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अमृतवाणी चा लाभ घ्यावा असे आवाहान ह.भ.प.संदीपजी महाराज यांनी केले आहे.

# शहाजी राजे भोसले जयंतीस सरदारांच्या वंशजाची उपस्थिती

## 18 मार्च रोजी मोठ्या उत्साहात दोन दिवसीय सोहळयाची जय्यत तयारी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज भोसले यांची 430 वी जयंती महोत्सव 2024 श्रीक्षेत्र वेरूळ येथे दी 18 मार्च रोजी मोठ्या उत्साहात द्विदिवसीय सोहळयाने साजरी करण्यात येणार आहे. श्रीक्षेत्र वेरूळ भूमीमध्ये छत्रपती शिवरायांचे पूर्वज तथा मासाहेब जिजाऊ आणि स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज यांचं वास्तव्य लाभलेले आहे. अशा या भूमीमध्ये भव्य दिव्य असं स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराजांच स्मारक आज दिमाखात उभ आहे राष्ट्र निर्मितीची प्रेरणा देणाऱ्या या भूमीमध्ये प्रत्येक वर्षी 18 मार्चला जयंती महोत्सव साजरा होत असतो याही वर्षी 18 मार्च 2024 ला भव्य दिव्य असा महोत्सव महाराष्ट्रातील शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. याप्रसंगी छत्रपती शिवरायांच्या सोबत जे पराक्रमी सरदार स्वराज्य निर्मितीसाठी लढले ज्या पराक्रमी योध्यांनी बलिदान दिले अशा योध्यांच्या मूळ घराण्यातील वंशज या जयंती महोत्सव प्रसंगी निमंत्रित केलेले आहे. या प्रमुख घराण्यांच्या वंशजांची भव्य दिव्य अशी मिरवणूक सुद्धा निघणार आहे याच बरोबर 17 मार्च रोजी सायंकाली दीपोत्सव तर 18 मार्च रोजी मिरवणूक, अभिवादनसह मार्गदर्शन होणार तर या सोहळयास विश्वातील सर्वात मोठी शिवजयंती साजरी करणारे शिवकालीन गायकवाड घराण्याचे वंशज अमित दादा गायकवाड पुणे मुंढवा, सर सेनापती हंबीरराव मोहिते घराण्याचे वंशज सरसेनापती राजेंद्र उर्फ संग्रामसिंह दादा मोहिते पाटील, सरनोबत येसाजी कंक यांचे वंशज रविंद्रजी कंक, सरदार कान्होजी जेधे यांचे वंशज सरदार युवराजजी जेधे, छत्रपती शिवरायांच्या धर्मपत्नी सकवारबाई साहेब यांचे ज्येष्ठ बंधू तसेच महाराजांचे प्रमुख अंगरक्षक कृष्णाजी उर्फ बंकी गायकवाड यांचे अकरावे वंशज सरदार संतोषराजे गायकवाड शिवनेरी जुन्नर, सरदार झुंजारराव मरळ यांचे वंशज सरदार प्रदीपदादा मरळ, सुभेदार तानाजी मालुसरे यांचे तेरावे वंशज सुभेदार कुणाल दादा मालुसरे, सुभेदार विक्रमसिंह मालुसरे, सरदार हैबराव शिळीमकर यांचे वंशज सरदार मंगेशराव शिळीमकर, सरदार गोदाजीराव जगताप यांचे वंशज मंथनराव जगताप सासवड, छत्रपती संभाजी महाराजांच्या दूध आई धाराऊ तथा शंभुराजांचे दुधभाऊ रायाजी गाडे पाटील यांचे वंशज अमित दादा गाडे पाटील, सरसेनापती नेताजी पालकर यांचे वंशज गणेशजी पालकर, वीर शिवा काशीद यांचे वंशज आनंदा काशीद, सरदार पिलाजीराव गोळे यांचे वंशज सरदार आबासाहेब गोळे, सेनापती धनाजी जाधव यांचे वंशज सेनापती समीर दादा जाधव, महाराजांचे वास्तु विशारद रायगडाचे निर्माते सरदार हिरोजी इंदलकर यांचे वंशज समीर दादा इंदलकर, सरदार मायनाक भंडारी यांचे वंशज ओमकार राजे नाईक भंडारी, श्रीमंत सुभेदार पिलाजीराव जाधवराव छत्रपती शाहू महाराज सातारा पहिल्या दर्जाचे सरदार व प्रमुख सल्लागार यांचे वंशज श्रीमंत सरदार समीर दादा जाधवराव, श्रीमंत सचिन दादा भोसले पाटील गडदुर्ग संवर्धन ट्रस्टचे विश्वस्त स्वखर्चाने 300 पेक्षा जास्त किल्ले स्वच्छता श्रमदान राबवणारे, येसूबाई आईसाहेब यांचे वंशज श्रीमंत दीपक राजे शिर्के गडदुर्ग संवर्धन ट्रस्ट कार्याध्यक्ष, सरदार पिलाजीराव गोळे यांचे वंशज सरनोबत सुशांत गोळे वाई आदी शिवरायांच्या सरदाराची वंशज तसेच मराठा आरक्षण साठी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन मराठा आरक्षणाचा लढा लढणारे माननीय संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्यासह पालकमंत्री संदीपान भूमरे, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे सह जिल्ह्यातिल सर्व आमदार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. महाराष्ट्रातील शिवभक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन जयंती महोत्सव समिती वेरूळ तथा स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान यांच्यावतीने अध्यक्ष राजेंद्र पवार, स्वागताध्यक्ष प्रकाश पाटील यानी आवाहन केले आहे तर यावेळी संतोष माने, शंकर काका आधाने, जगन्नाथ खोसरे, अरुण नवले, राजू चव्हाण, गणेश नाना आधाने, अनिल चव्हाण, नरेंद्रसिंह सालूँखे, एल जी गायकवाड, अनिल मिसाळ, दीपक शुक्ला, महेश उबाळे, दिनेश आंभोरे, इमरान पठान, कारभारी ढीवरे, विजु भालेराव, मुलचंद चव्हाण, मस्सी सौदागर, मदन राठोड, सतीश फुलारे, सुरेश थोरात, युवराज ठेंगड़े, शेकनाथ होळकर, किरण डोनगांवकर, देवयानी डोनगांवकर, अनिल श्रीखंडे, राजू वरकड़, मोहन गवली, कारभारी जाधव, परसराम बारगळ, प्रकाश चव्हाण, आजीनाथ नागे, दयानंद फुलारे, गणेशसिंह हजारी यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिति होती.

# अंनिस समाजातील अंधश्रद्धा बाहेर काढते : मंदाकिनी गायकवाड

## तरडगाव येथील महिला दिन कार्यक्रमात केले प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तरडगाव, ता.फलटण येथे महिलांकरिता ग्रामपंचायतीच्या वतीने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाच्या ठिकाणी महाराष्ट्र अंनिस फलटण शाखेच्या वतीने प्रबोधन घडवुन आणणाऱ्या विविध पुस्तकांचा स्टॉल लावण्यात आला होता. महाराष्ट्र अंनिस फलटण शाखेच्या कार्याध्यक्षा मंदाकिनी गायकवाड यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील पाळी आणि गैरसमज व अंधश्रद्धा निर्मूलन यावर महिलांना विशेष मार्गदर्शन केले. महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी तरडगावच्या सरपंच जयश्रीताई चव्हाण यांनी मंदाकिनी गायकवाड यांना सांगितले असता. त्यांनी समाजातील विविध अंधश्रद्धा यावर परखड पणे मांडणी केली. अंनिस समाजातील अंधश्रद्धा बाहेर काढते, असे मंदाकिनी गायकवाड यांनी म्हटले. यावेळी विचारमंचावर तरडगावच्या सरपंच जयश्रीताई चव्हाण यांच्या सह इतर मान्यवर व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महाराष्ट्र अंनिस फलटण शाखेच्या कार्याध्यक्षा मंदाकिनी गायकवाड म्हणाल्या की, अंनिस ही संस्था श्रद्धा आणि देवाधर्माच्या विरोधात नाही.परंतु देवाधर्माच्या नावाखाली समाजात ज्या काही अनिष्ट रूढी,परंपरा व शोषण करणाऱ्या गोष्टी सुरू आहेत.या विरोधात संविधानाच्या चौकटीत राहून विविध प्रबोधन घडवून आणण्याचे काम करत आहेत. विधवा प्रथा बंद यासाठी सुद्धा प्रबोधन करत आहे. या कार्यक्रम प्रसंगी महिला बचतगट पदधिकारी महिला सुद्धा उपस्थित होत्या. नरेंद्र दाभोलकर, विवेकी विचारांची पुस्तके, गैरसमजाच्या प्रदेशात, बुवा बाजी, चमत्कार मागील विज्ञान, चमत्कार सादरीकरण, तसेच तिमिराकडून तेजाकडे, डार्विनचा सिध्दांत,वयात येताना, स्त्रिया व त्यांच्या अंधश्रद्धा,शाहू महाराज, शिवाजी कोण होता?, तसेच विद्रोही तुकाराम बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे राजकारण बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांसारखी अनेक पुस्तके स्टॉलवर विक्रीसाठी ठेवण्यात आली होती.एका आजीबाईने शिवाजी कोण होता ?हे पुस्तक आवर्जुन विकत घेतले. याबद्दल खूप समाधान वाटले असल्याचे मंदाकिनी गायकवाड यांनी म्हटले. महाराष्ट्र अंनिसच्या माध्यमातून समाजात जाऊन प्रबोधन करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सुद्धा मंदाकिनी गायकवाड यांनी सांगितले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार विजय जगताप यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय विभागामार्फत दिला जाणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार नेवासा तालुक्यातील सोनई येथील फुले शाहू आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते विजय जगताप यांना नुकताच मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम केल्याबद्दल हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जातो. मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत युवा व कल्याणमंत्री ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सदरचा पुरस्कार विजय जगताप यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराबद्दल विजय जगताप यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वारसास चौदा लाखांचा विमा धनादेश प्रदानः एल.आय.सी.ची तत्परता

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** शनिशिंगनापुर परिसरातील हनुमानवाड़ी शिवारात येळवंडे वस्ती येथील प्रशांत बाळासाहेब धनवटे वय -34 यांचे निधन झाल्याने त्यांच्या विमा सरक्षण योजनाखाली त्यांच्या वारसदार त्यांच्या मातोश्री संगीता बाळासाहेब धनवटे यांना 14 लाख 10 हजार 944 रूपयेचा धनादेश विमा क्लेम शाखा व्यवस्थापक दिलीप कटके व विकास अधिकारी यशवंत शिंदे यांच्या हस्ते वारसाला सुपुर्त करण्यात आला.

त्यांची घरची परिस्थिति अत्यंत हालाकीची असून रोजानदारी करुन आपल्या कुटुम्बाचा उदार निर्वाह करत, त्यामधे त्यांना ह्रदयविकारचा झटका आल्याने मृत्यु झाला त्यांनी साईं इंशुरन्स सर्विहिस कडून संचालक श्री सुधीर झीने यांनी जीवन विमा उतरला होता,विमा धोरणानुसार



झीने यांनी या व्यक्तिचा विमा आपल्याकड़े असून तात्काळ झिने यांनी त्यांची सर्व माहिती घेऊन संपर्क केला, पूर्ण माहिती कुटुबाला देण्यात आली.नगर येथील 95 X शाखाचे अधिकारी दिलीप कटके व विकास शिंदे यांनी मुख्य कार्यलयात धनादेश खात्यात वर्ग केला. वेळोवेळी पाठपुरवा करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावलीने अवघ्या तीन महिन्यात विमा रक्कम मिळाली.झिने यांनी या प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा केल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

# कापूस, तुरीचे दर कडाडले, नऊ हजारांचा उच्चांक गाठणार : जि.प. सदस्य जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कापसाला पुरेसा दर नसल्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस साठवला आहे. मागील आठवड्यापासून कापसाच्या दरात थोडी वाढ झाली असून बाजारपेठेत कापसाची विक्री सुरू आहे. सोयाबीन आणि तूर दरातही वाढ झाली आहे. कापूस, तूर आणि सोयाबीन पिकांना योग्य बाजारभाव नसल्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. गेल्या आठवड्यापासून

कापूस दराने गाठला उच्चांक

शेतमालाच्या दरात किचित सुधरणा झाली आहे. छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समिती, लासूर बाजारपेठेसह इतर ठिकाणी आवक वाढली असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले आहे. कापसाचे दर सहा ते सात हजार रुपये प्रतिक्विंटल होते. दरात वाढ झाली असून, सद्यस्थितीत कापसाला सात हजार ८०० ते आठ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे.



त्यामुळे साठवलेला कापूस शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणला आहे. पुढील काही दिवस कापूस विक्री वाढणार आहे. सोयाबीनची मागणी वाढल्यामुळे साडेचार हजार रुपये प्रतिक्विंटल स्थिरावलेल्या दरात वाढ झाली आहे. सध्या पाच ते पाच हजार ४०० रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन विक्री सुरू आहे. तूर नऊ हजार रुपये प्रतिक्विंटल दराने विक्री होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. शेतमालाच्या दरात सुधारणा झाल्याने बाजारपेठेत आवक वाढली आहे. खासगी व्यापारी गावोगावी वाहने नेऊन शेतमाल खरेदी करीत आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीतही या आठवड्यात उलाढाल वाढण्याची शक्यता असल्याचे माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना दिली.

# कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयास 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत उत्कृष्ट पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**पिंपळनेर :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 2023-24 साठी ' करिअर कट्टा ' उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये पिंपळनेर येथील कर्म.आ.मा.पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयास 'उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय ' म्हणून द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एन. भारंबे हे होते. उद्घाटक म्हणून कबचौउमवि चे प्र. कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, प्रमुखातिथी म्हणून जळगाव उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ. संजय ठाकरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, विद्यार्थी विकास कल्याण विभागाचे डॉ. जयेंद्र लेकुरवाळे व प्राचार्य डॉ. राणे व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे प्रमुख यशवंत शितोळे आदी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थित व विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ .जयेंद्र लेकुरवाळे यांच्या हस्ते उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून द्वितीय पारितोषिक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.के.डी. कदम यांनी व करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रोफेसर डॉ. सतीश मस्के यांनी स्वीकारले. त्याचबरोबर महाविद्यालयीन उत्कृष्ट समन्वयक म्हणून प्रोफेसर डॉ.सतीश मस्के यांनाही तृतीय पारितोषिक मिळाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगेश महाले यांनी केले तर आभार प्रा. राजू पवार यांनी मानले.

# परतुरात अवैध धंदे गुटखा विक्री जोमात

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राज्यात गुटखा विक्रीला बंदी असतानाही तालुक्यात आणि शहरात गुटख्याची दणक्यात विक्री सुरू आहे. विक्रेत्यांना अभय दिले जात असल्याने गुटखा विक्री जोमात आणि अन्न औषध प्रशासन कोमात गेल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्रीला बंदी आहे; परंतु परतूर शहरात राजरोसपणे गुटखा विक्री सुरू आहे. बाहेरून रात्री-अपरात्री येणाऱ्या गाड्यांतून गुटख्याच्या पुड्यांच्या माळा तरटाच्या पोत्यात खचाखच भरलेल्या असतात. रातोरात गुटख्याची पोती स्थानिक विक्रेते दुचाकी-चारचाकीतून घेऊन जातात. एका ठिकाणी याचा काहीसा साठा करून ठेवला जातो. हाच साठा काही दिवस परिसरातील गावोगावच्या विक्रेत्याकडे मागणीनुसार पोहोच केला जातो. परतूर रस्त्यावर तसेच ठिकठिकाणी गुटख्याच्या रिकाम्या पुड्या दिसून येतात. तर सार्वजनिक शौचालयासह अनेक ठिकाणचे कानेकोपरे गुटख्याने रंगलेले दिसतात. अन्न व औषध प्रशासनामार्फत गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. मात्र अन्न प्रशासनाकडून कुठल्याही विक्रेत्यांवर गेल्या काही महिन्यांमध्ये कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. तसेच पोलिसांकडूनही गुटखा विक्रेत्यांवर कारवाई केल्याचे दिसून आले नाही. बेकायदा गुटख्याची विक्री सुरू असताना अन्न प्रशासन आणि पोलिस प्रशासन याकडे दुर्लक्ष का करतंय? असा प्रश्न अनेकाकडून उपस्थित केला जात आहे.

# तक्रार आल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील: सपोनि संजय आहिरे

## तर डॉ. खरात हे वेट अँड वॉचच्या भूमिकेत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राजूर येथील खरात हॉस्पिटलमध्ये उपचार दरम्यान बारा वर्षीय दिशा नावाच्या शाळकरी मुलीचा मृत्यू झाला. ही घटना अत्यंत दुर्दैवी म्हणावी लागेल. याचे कोणी समर्थन करू शकत नाही. परंतु डॉक्टरवर अशा प्रकारे प्राणघातक हल्ला करणे हे कितपत योग्य आहे याचा देखील समाजाने विचार करायला हवा.डॉक्टरानी चुकीचे उपचार केल्याचा आरोप करत डॉक्टरवर हल्ला चढवत हॉस्पिटलची तोडफोड करण्यात आलेली सर्व दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहेत. पोलीस वेळेवर घटनास्थळी पोहोचली म्हणून मोठा अनर्थ टळला.

तोडफोडीची घटना घडून दोन दिवस उलटून गेले तरी अजूनही हसनाबाद पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल झाल्यास दोषींवर कारवाई करण्यात येईल असे हसनाबद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय अहिरे यांनी सांगितले. तर तोडफोड व हल्ला होऊन दोन दिवस उलटून गेले तरीही डॉक्टर खरात यांनी आद्यपही तक्रार दाखल केली नसल्याने सध्या तरी डॉ. खरात वेट अँड वॉच या भूमिकेत दिसत आहेत. हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय अहिरे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की हॉस्पिटलची तोडफोड करून डॉ. खरात यांच्यावर प्राण घातक हल्ला करणाऱ्याविरुद्ध तक्रार आल्यास कारवाई करण्यात येईल.अन्यथा भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास त्याची गय केली जाणार नाही असेही सपोनि अहिरे यांनी सांगितले. परंतु या संदर्भात डॉ. खरात रीतसर तक्रार दाखल करणार की या घटनेस पूर्णविराम देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे . सध्यातरी ते वेट अँड वॉच या भूमिकेत दिसत आहेत.



# नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस नेते मारोतराव कवळे गुरूजींचा भाजपामध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नेते शंकरराव चव्हाण, सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार राजेश पवार, ज्येष्ठ नेते भाऊराव देशमुख, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, माजी आमदार अमर राजुरकर आदी उपस्थित होते. कवळे गुरुजी यांच्या भाजपा प्रवेशामुळे नांदेड जिल्ह्यात भाजपाला आणखी बळ मिळेल असे प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे यांनी सांगितले. श्री.कवळे गुरुजी यांनी नायगाव विधानसभा मतदार संघात दुध डेअरी, गूळ उत्पादन,सहकारी पतसंस्था आणि सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे.

नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात दीर्घ काळ काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. काही दिवसांपूर्वीच माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. त्यापाठोपाठ नांदेड महापालिकेच्या 55 माजी नगरसेवकांसोबतच भोकर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे.

# शहरात वन्य प्राण्यांचा सतत हैदोस, वनमंत्री, प्रशासन गप्प का? : रविभाऊ पुप्पलवार



आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** शहरात सतत काही दिवसांपासून वन्य प्राण्यांचा हैदोस सुरू आहे. आज पुन्हा वन्य प्राण्याकडून पंडित दिनदयाल वार्डातील 7 वर्षीय चिमुकली साफिया इकबाल शेख घराजवळ खेळत असताना बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार यांनी चिमुकलीच्या कुटूंबाची भेट घेतली. दोन दिवसांपूर्वीच आम आदमी पक्षाच्या शिष्टमंडळाने पेपरच्या बांबू स्टॉक यार्ड बाबत उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. या स्टॉक यार्डमुळे वन्य प्राण्यांना शहरात लपून राहणे सोपे होते. इथूनच वन्य प्राण्यांचा हैदोस सुरू आहे. नागरिकांवर वन्य प्राण्यांकडून होत आहेत. यावर स्थानिक आमदार ज्यांच्यावर वनमंत्री पदाची जबाबदारी आहे ते गप्प का आहेत? यावर प्रशासनाकडून ठोस उपाययोजना का केले जात नाही? केव्हा पर्यंत नागरिकांचा अश्या प्रकारे वन्यप्राण्यांमुळे धोक्यात राहिल असा सवाल रविभाऊ पुप्पलवार यांनी उपस्थित केला.



# कु. प्रगती काळे हिचा पारितोषिक देत गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलची विद्यार्थ्यांनी हिचा पारितोषिक देत गौरव करण्यात आला. आज दिनांक १२ मार्च रोजी ग्रामपंचायत गोळेगाव छत्रपती शिवरायांच्या जन्मदिवसानिमित्त आयोजित केलेल्या ग्राम स्वराज्य रक्षक संस्कारक्षम मावळा स्पर्धा २०२४ रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगी शाळेतील विद्यार्थिनी कू प्रगती विठ्ठल काळे हिला विशेष पारितोषिकाने गौरविण्यात आले. यावेळी पदाधिकारी नागरिक उपस्थित होते.

# नागरिकत्व दुरुस्ती कायदा लागू; साखर वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** नागरिकत्व दुरुस्ती कायद्यासंदर्भात (सीएए ) अधिसूचना जारी करण्यात आल्यानंतर सोमवारी भाजपच्या वतीने इचलकरंजीत साखर वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला. केंद्रीय गृह मंत्रालयाने आज नागरिकत्व दुरुस्ती कायद्यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याचा मसुदा संसदेत सादर होऊन पाच वर्षे उलटली. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशात हा कायदा लागू केला जाईल असे विधान अलीकडेच केले होते. तर, सोमवारपासून देशभरात नागरिकत्व दुरुस्ती कायदा लागू करण्यात आला आहे. भारत माता की जय, वंदे मातरम, मोदी जिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. शहराध्यक्ष अमृत भोसले, महिला अध्यक्ष अश्विनी कुबडगी, बाळासाहेब तोतला, उमाकांत दाभोळे, दीपक पाटील यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# काँग्रेसचे माजी मंत्री पद्माकर वळवींचा भाजपात प्रवेश

## काँग्रेसला अनेक मोठे धक्के बसणार : भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री पद्माकर वळवी यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप होईपर्यंत महाराष्ट्रात काँग्रेसला अनेक मोठे धक्के बसणार आहेत, असे सूचक भाष्य भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बानवकुळे यांनी यावेळी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, ग्रामिण विकास मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती. स्मिता वाघ, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आदी उपस्थित होते. श्री. बावनकुळे यांनी सांगितले की, काँग्रेसने आदिवासी समाज आणि मागासवर्गीयांची नेहमीच फसवणूक केली. या समाजातील नेत्यांना हे लक्षात आल्याने हे नेते भारतीय जनता पार्टीत प्रवेश करू लागले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पाला साथ देण्यासाठी श्री. वळवी यांनी काँग्रेस सोडून भारतीय जनता पार्टीत प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा अनुभव व ज्येष्ठता लक्षात घेऊन संघटनेत त्यांचा सन्मान राखला जाईल, असेही श्री. बावनकुळे यांनी नमूद केले. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा नंदुरबारमध्ये असतानाच वळवी यांच्यासारखा निष्ठावंत नेता, माजी मंत्री काँग्रेसला सोडचिठ्ठी देतो यावरून या पक्षाची दारूण अवस्था लक्षात येते. राहुल गांधींच्या यात्रेचा समारोप होईपर्यंत राज्यातील अनेक काँग्रेस नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीत प्रवेश करतील, असेही ते म्हणाले.



वळवी यांनी सांगितले की, आपण काँग्रेसचे आजवर निष्ठेने काम केले. मोदी सरकारकडून होणाऱ्या विकासकामांमुळे प्रभावित होऊन आपण भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. भाजपा संघटनेचे काम आपण निष्ठापूर्वक करू. वळवी हे 1999 ते 2014 या काळात तळोदा व शहादा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले होते. 2009 ते 2014 या काळात वळवी हे राज्य मंत्रिमंडळात मंत्री होते. यावेळी प्रदेश काँग्रेस सरचिटणीस विनायक देशमुख, जालना जिल्ह्यातील मनसे नेते ज्ञानेश्वर(माऊली) गायकवाड, प्रदेश काँग्रेस सचिव अर्चना राठोड, जळगाव जिल्हा काँग्रेस सरचिटणीस मनोज सोनावणे, नंदुरबार पंचायत समितीचे माजी सदस्य लगन पावरा, महेंद्र बागुल, प्रदेश आदिवासी काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. रोशन गावित यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.



# विधान परिषद सभापती डॉ. नीलिमा गोऱ्हे यांचे शनिदर्शन

## देवस्थानच्या विकासाला हातभार लावू

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** शिनिशिंगनापुर येथे दर्शनासाठी दरोरोज भाविक येत असतात, त्यासाठी देवस्थानच्या विकासासाठी, योजनासाठी पाठपुरवा करू, तसेच काही त्रुटि असेल तर शासनाला शिफरस करुन निधी उपलब्ध करू, असे मत राज्य विधानपरिषदचे सभापती नीलिमा गोरे यांनी व्यक्त केले. पुण्याहुन दुपारी 12.30 च्या सुमारास मोटारीने शनिशिंगनापुरात दाखल होताच शासनाच्या वतीने नेवासा तहसीलदार संजय बिराजदार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर गोरे यांनी विधिवत धार्मिक विधिने शनीचौथारावर जाऊन तेल वाहुन शनिदर्शन घेतले. देवस्थानला यावेळी ना.गोरे यांनी देणगी दिली. देवस्थानच्या वतीने उपाध्यक्ष विकास बानकर, पोलिस पाटील अड्. सयाराम बानकर, नितिन शेटे ,कार्यकारी अधिकारी जी.के.दरदले यांनी शनीप्रतिमा, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. शनिशिंगनापुरचे पोलिस निरीक्षक खगेन्द्र टेभेकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. नुकतेच शनिशिंगनापुर येथे देशाचे राष्ट्रपती द्रौपती मुर्म यांच्या नंतर उपसभापती ना.गोरहे यांनी भोजणाचा आस्वाद घेतला.

# अधिवेशनात घडला सत्यशोधकी विचारांचा जागर

## नायगाव येथे पहिले महिला अधिवेशन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण वर्षपूर्तीच्या अनुषंगाने नायगांव ता.खंडाळा येथे सत्यशोधक महिला समाज संघाच्या वतीने पहिले महिला अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. सत्य शोधन मांडणाऱ्या विविध उपक्रमातून हे अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. या अधिवेशनातून सत्यशोधकी विचारांचा जागर घडुन आला.परखड विचारांची अनेक मांडणी या अधिवेशनातून करण्यात आल्याने सत्य परिस्थितीचा आढावा महिलांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या अधिवेशनातून करण्यात आला.यावेळी राज्यातील विविध ठिकाणाहून आलेली लोकं ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित होती.ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांचे घर व स्मारकाला अभिवादन करून रॅलीची सुरुवात करण्यात आली.यावेळी नायगावच्या सरपंच साधनाताई नेवसे यांनी क्रांतीची मशाल हाती घेतली.रॅलीतून "जय ज्योती,जय क्रांति"या नाऱ्या सोबतच सर्व बहुजन महामानव व महामातांच्या विजय असोच्या घोषणा देण्यात आल्या.ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सभा मंडपामध्ये ही रॅली आणण्यात आली. सावित्रीमाईंच्या लेकींनी खंडेरायाची तळी उचलून पहिल्या अधिवेशनास सुरुवात करण्यात आली. महिला मान्यवरांच्या हस्ते सत्यशोधकीय झेंड्याचे ध्वजारोहण करण्यात आले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.पहिल्या सत्राच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक समाज महिला संघाच्या अध्यक्षा वंदनाताई वनकर होत्या. प्रमुख वक्त्या स्मिताताई पानसरे, ॲड.वैशालीताई डोळस, सुजाताताई गुरव, दर्शनाताई पवार, ॲड.वासंती नलावडे, झेबूनिस्सा शेख उपस्थित होत्या.प्रमुख अतिथी म्हणुन वैशालीताई पतंगे, स्वातीताई कोरी,मंजिरीताई धाडगे,कॉ.आनंदी अवघडे,डॉ.कुंदाताई धुळे, मीनाक्षीताई राजेंद्र कुंभार,जयश्रीताई लोंढे तसेच विशेष निमंत्रित महिलांमध्ये निताताई नेवसे, सविताताई फाळके,सुनंदाताई जाधव, संगीताताई सूर्यवंशी, गायत्रीताई इरले,लताताई खाडे, सुनिताताई माळी,वैष्णवीताई राऊत, संगीताताई वसमाने उपस्थित होते.विचार मंचावरील सर्व महिला अतिथींचे स्वागत हे ग्रंथ देऊन करण्यात आले.या अधिवेशनाचे प्रास्ताविक अर्चना तांबे,रिंपल जाधव यांनी केले.ह भ प विजय महाराज भोईरकर यांचे सत्यशोधकीय कीर्तन संपन्न झाले. यानंतर विचार मंचावरील प्रमुख महिला व त्यांनी विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षता ॲड.वैशालीताई डोळस या होत्या.दुसऱ्या सत्रात "प्राचीन भारताची क्रांतिकारी महिला कालांतराने गुलाम का झाली?" या विषयावर गटचर्चा करण्यात आली.यानंतर सत्यशोधक समाज संघाच्या वतीने हरी नरके लिखित "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले " व पी डी पाटील लिखित "आदर्श महामाता " पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.या अधिवेशनात विविध पुस्तकांचे स्टॉल लावण्यात आलेले होते. अधिवेशनाला आलेल्या महिलांनी हजारोंच्या संख्येत पुस्तकांची खरेदी करून वैचारिक मेजवानी घेतली. सत्यशोधक समाज महिला संघाच्या वतीने विविध ठराव पारित करण्यात आले व सर्वांनी एकमताने मंजुरी देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी खैरनार, प्रतिभा महाजन तर आभार अनुरीता झगडे, व श्वेता शिंदे यांनी केले.



सत्यशोधक समाज संघाचे संस्थापक अध्यक्ष अरविंद खैरनार,सचिव सुरेश झाल्टे,महिला अध्यक्षा वंदनाताई वनकर,स्वागत समिती अध्यक्षा साधनाताई नेवसे,कार्याध्यक्ष रूपालीताई इंगोले, संयोजिका शिवमती उज्वला तांबे,डॉ.डी.बी.शेंडे, विधेकर्ते साळुबा पांडव, रामचंद्र भागवत,विजय लुल्हे,पी डी पाटील,कैलास जाधव,शिवदास महाजन,रमेश वराडे,कविराज पाटील तसेच सर्व सत्यशोधक समाज संघाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच डॉ.नितीन सावंत,प्रा.एस.वाय.पवार इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती.हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी गिरीश बनकर,प्रशांत ढावरे,उज्वला तांबे,ॲड.सुनिल नेवसे,राजेंद्र नेवसे,संजय करपे,दत्ताजी जाधव,अजित जाधव,सुनिल रासकर आदींनी तसेच नायगाव ग्रामस्थ व नायगाव ग्रामपंचायत, भैरवनाथ शिक्षण संस्था नायगाव यांनी विशेष मेहनत घेतली. महाराष्ट्रातील विविध भागातून जास्तीत-जास्त सत्यशोधक बंधू-भगिनींनी या नायगाव येथील ऐतिहासिक महिला अधिवेशनात सहभाग घेतल्याने सर्वजण या ऐतिहासिक क्षणाच्या साक्षीदार बनल्या असल्याच्या भावना आयोजकांकडून व्यक्त करण्यात आल्या.

# बेल्हेकर शिक्षण संस्थेत नारी शक्तीचा गौरव करून जागतिक महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील भानसहिवरा येथील सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउददेशीय शिक्षण संस्थेत जागतिक महिला दिनानिमित्त आहार तज्ञ श्रीमती माधुरीताई ठोंबरे यांचे पौष्टिक आहार आणि सदृढ आरोग्य विषयी मार्गदर्शन व नारी शक्तीचा गौरव सोहळा पार पडला.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या प्रसंगी सरस्वती पूजन करुन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.रंजनाताई बेल्हेकर आहार तज्ञ माधुरीताई ठोंबरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात येऊन नारी गौरव सोहळयाचा शुभारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी बेल्हेकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश पाटीलबा बेल्हेकर हे होते. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी अनंत जोशी, अभिषेक बेल्हेकर,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुरबट सर, पी.व्ही. बेल्हेकर आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ. भालसिंग, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य हेमंत अहिरे, ज्ञानेश्वर इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य भैरवनाथ तांबारे, ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य काकासाहेब वाल्हेकर, शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य स्वाती वाघे, एम.बी.ए.कॉलेजचे प्राचार्य लोसरवार सर, ऑफिस सुप्रेटेनड न्स शिवनारायण वाघे, अजित तांबे, मनोज माने,विभाग प्रमुख अमोल विघे,विभाग प्रमुख संगीता हापसे उपस्थित होते.

शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती स्वाती वाघे यानी प्रास्ताविक केले. यावेळी संचालिका डॉ.रंजनाताई बेल्हेकर यांच्या हस्ते सुप्रसिद्ध आहार तज्ञ श्रीमती माधुरी ठोबरे यांचा सत्कार करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी व विविध कॉलेज मधील विद्यार्थिनींनी सांस्कृतिक व मर्दानी खेळाची प्रात्यक्षिके सादर केली. तसेच विविध भाषणामधून स्त्री शक्तीचा जागर करण्यात आला.




यावेळी बोलताना माधुरीताई ठोंबरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना संतुलीत आहार व व्यायाम तसेच आरोग्य विषयी प्रगल्भ असे मार्गदर्शन केले व महिलांनी दैनंदिन जीवनात इतरांची जशी काळजी घेतात तसेच स्वतःची काळजी घ्यावी, यासाठी त्यांनी नियमित आहार व योगा, व्यायाम करावा असे आवाहन केले

शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.रंजनाताई बेल्हेकर यांनी आपल्या भाषनातून स्त्री ने प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उतुंग अशी भरारी घेतलेली असल्याने स्त्री शक्तीचा जागर म्हणून नारी गौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले असून राजमाता जिजाई माँसाहेब,सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आता स्त्री शक्तीने प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन यावेळी बोलताना केले. यावेळी झालेल्या नारी शक्ती गौरव सोहळयाच्या प्रसंगी श्रीमती अश्विनी गायकवाड, रविंद्र आदमाने, बापूसाहेब नवथर, गणेश निकम, प्रविण जाधव, प्रतिक देवकर, महेश भणगे, ऋतिक ठोकळ, रमेश राठोड,नितीन उबाळे, विशाल जैन, विकास खंडागळे, कु.मयुरी निपुंगे, कु. कविता पेटे, विद्या मरकड, प्रियंका द्विवेदी, महेश फडतळे, अविनाश काळे, रामेश्वर उगले, सोनवणे, नाथाभाऊ शिंदे, अजित खुळे, गणेश अंबाडे, संजय बर्वे, दत्ता पाटील, सुनीता कराड, सदाशिव वाहुरवाघ, मयुरी नेटके, कोमल जाधव, वैशाली साळवे या सर्व शिक्षकानी सोहळा यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. अमोल विघे व नानासाहेब गायकवाड यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



बाजार सावंगी : उन्हाळ्याच्या दिवसात डोंगराळ भागात पळसाची झाडे बहरली असून फुलांच्या बहरण्याने परिसर शोभिवंत व खुलून दिसत आहे. बाजार सावंगी-रेल-धामणगाव-तिसगाव या रस्त्यावरदेखील अनेक ठिकाणी पळसाची झाडे असून मनमोहक दृश्य पहावयास मिळते. बाजार सावंगी-तिसगाव रस्त्यावर धामणगाव शिवारात मनमोहक पळसाचे झाड.

# आरोग्य मंदिरद्वारे आरोग्यसेवा आपल्या दारी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत सरकारने आरोग्य सेवा अधिक सुलभ करून त्या प्रत्येकाच्या घराजवळ उपलब्ध करून देण्याचे अभियानच हाती घेतले आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून नाशिक महानगरपालिकाक्षेत्रात आयुष्यमान आरोग्य मंदिरचा लोकार्पण सोहळ केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ भारती प्रवीण पवार यांच्या हस्ते वडजेनगर आयुष्यमान आरोग्यमंदिरात संपन्न झाला . याच बरोबर शहरात वेगवेगळ्या भागात सेवा देण्यासाठी सज्ज इतर केंद्राचा ऑनलाईन शुभारंभही करण्यात आला.



लोकार्पण सोहळ्याचे श्रीमती पवार यांनी दीपप्रज्वलन करून आरोग्य केंद्राचे फित कापून उद्घाटन केले व केंद्राची पाहणी केली.त्यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.पाहुण्यांचा सत्कार आणि स्वागत आयुक्त तथा प्रशासक डॉ.अशोक करंजकर,अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ तानाजी चव्हाण यांनी केले. आज शहरात एकूण ४६ आयुष्मान आरोग्य मंदिरचे लोकार्पण ऑनलाइन पद्धतीने ना.पवार यांच्याहस्ते पार पडले. या लोकार्पण सोहळ्याचे थेट प्रक्षेपण नाशिक महानगरपालिकेच्या सहाही विभागीय कार्यलयात एलईडी स्क्रिनवर दाखविण्यात आले. ऑनलाइन कार्यक्रमास शहरातील लोकप्रतिनिधी, नाशिककर उपस्थित होते.

नागरी भागात वैद्यकीय सेवा भक्कम करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने महापालिका क्षेत्रात आयुष्यमान आरोग्य मंदिर उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे.केंद्रशासनाने १५ वा वित्त आयोगांतर्गत प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्रांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम २०२१-२२ ते २०२५-२६ या ५ वर्षाच्या कालावधीत राबविले जात आहेत.नाशिक महापालिकेला पंधराव्या वित्त आयोगातून १०६ आयुष्यमान आरोग्य केंद्र उभारण्यात येणार आहे.त्यापैकी ४६ आयुष्मान आरोग्य केंद्राचे काम पहिल्या टप्प्यात पूर्ण करण्यात आले. या सर्वांचा लोकार्पण सोहळा आज पार पडला.या आरोग्य केंद्रात १ एमबीबीएस डॉक्टर,१ स्टाफ नर्स,१ बहुद्देशीय सेवक व १ सहाय्यक अशी नियुक्ती केली जाणार आहे.या आरोग्य मंदिरची वेळ दुपारी २ ते रात्री १० अशी राहणार आहे.आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून सर्वच आजारांवर उपचार केले जाणार आहेत.
माता व बाल आरोग्य तपासणी या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून होईल.

या लोकार्पण सोहळ्यास अतिरिक्त आयुक्त (शहर) प्रदीप चौधरी,उपायुक्त डॉ.विजयकुमार मुंडे,श्रीकांत पवार,,शहर अभियंता शिवकुमार वंजारी,अधीक्षक अभियंता संजय अग्रवाल,कार्यकारी अभियंता संदेश शिंदे,सहा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अजिता साळुंखे,डॉ.प्रशांत शेटे,डॉ.नितीन रावते,,जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद,विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय देवकर, आदीसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आयुष्मान आरोग्य केंद्राच्या लोकार्पण सोहळ्याचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले.आभार प्रदर्शन डॉ.अजिता साळुंखे यांनी केले.

# सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे यांच्या सहकार्यामुळे शेकडो शिक्षकांना मिळाला न्याय

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मागील 15 ते 20 दिवसांपासून नांदेड जिल्हा परिषद विषय शिक्षकांच्या दर्जन्नतीमध्ये प्रचंड गोंधळ आणि अनागोंदी माजली होती. विषय शिक्षकांच्या पदस्थापनेचा तिढा काही केल्या सुटत नव्हता. विषय शिक्षक दर्जोन्नतीमध्ये अन्याय झालेल्या सर्व शिक्षकांमध्ये प्रशासनाच्या विरुद्ध प्रचंड रोष निर्माण झाला होता. कोणी लक्ष द्यायला तयार नव्हते.काही ठरावीक शिक्षक बांधवाना पदस्थापना बदलून मिळत होत्या पण सामान्य वाडीतांड्यावरील शिक्षक न्यायाच्या प्रतिक्षेत होते आश्या गंभीर प्रश्नी तथा प्रसंगी म.रा.शिक्षक सेनेच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शामसुंदर शिंदे यांना भेटून जि.प. प्रशासनाने दर्जोनंतीत होत असलेली अनियमितता व शिक्षकावर झालेला अन्याय यावेळी पटवून सांगण्यात आले. आदरणीय सौ आशाताईने ताबडतोब जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल मॅडम यांच्यासोबत सखोल चर्चा करून विषय शिक्षकांना समुपदेशनानुसारच दर्जोनंती मिळणे किती आवश्यक आहे हे पटवून सांगितले . सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे जिल्ह्यातील शेकडो विषय शिक्षकांच्या दर्जोनंतीचा गंभीर प्रश्न मार्गी लागला व अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळाला त्या बद्दल शिक्षक सेनेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, जिल्हा सरचिटणीस रवी बंडेवार सर,जिल्हा उपाध्यक्ष श्री अविनाश चिद्रावार सर,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक काशिनाथ शिरसीकर सर लहू पंदलवाड सर,राजेश पवार सर सह अनेक न्याय मिळालेले शिक्षक उपस्थित होते.



# वीजचोरीच्या ११ प्रकरणांत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नारेगाव व मिसारवाडी परिसरात वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर महावितरणने धडक कारवाई केली. याप्रकरणी सहायक अभियंता सतीश अधाने यांच्या फिर्यादीवरून सिडको पोलिस ठाण्यात ११ प्रकरणांत सोमवारी रात्री वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या चिकलठाणा एमआयडीसी शाखेचे सहायक अभियंता सतीश अधाने, त्यांचे सहकारी वरिष्ठ तंत्रज्ञ विनोद तित्तर, गोलाजी नागरे, एस.यू. साबळे, तंत्रज्ञ योगेश गायके व विद्युत सहायक अस्लम शेख व पंचांनी नारेगाव व मिसारवाडी परिसरामध्ये ऑगस्ट ते डिसेंबर २०२३ या कालावधीत वेगवेगळ्या दिवशी मीटर तपासणी मोहीम राबविली. त्यावेळी अनेक ग्राहकांनी मीटरमध्ये फेरफार करून व आकडे टाकून वीजचोरी केल्याचे आढळून आले. वीजचोरांची नावे (कंसात वीजचोरीची रक्कम रुपयांत) – सय्यद सुरैय्या सय्यद रब्बानी (१२८५५), सय्यद फारुख सय्यद इमाम (९९८५), राजूशहा कांकरशहा सय्यद व वापरकर्ता शेख साजेद बेगम मगदूम (१२४४०), इम्रान खान इरफान खान (२५७२४), वापरकर्ता मकसूद शेख युसूफ शेख (२३३६०), इम्तियाज अहमद मोहंमद मुश्तकिम (१५०८५), राजेंद्र रामलक्ष्मण प्रसाद (२०२७६), पटेल चांद अहमद (२४५०), अब्दुल माजेद अब्दुल वाहेद (१२९४५), मालेका गफार खान (२०२७६) व चंद्रकला देविदास अरण (७०८५). वरील आरोपींना वीजचोरीची बिले देण्यात आली. मात्र ती भरण्यास त्यांनी टाळाटाळ केली. अखेरीस सहायक अभियंता सतीश अधाने यांच्या फिर्यादीवरून सिडको पोलिस ठाण्यात आरोपींवर भारतीय विद्युत कायद्यानुसार सोमवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

# सिंहगड रस्त्यावर किरकटवाडीत अफूची शेती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील किरकटवाडीत बेकायदा अफूची लागवड करण्यात आल्याचा प्रकार ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने आणला. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून १४ किलो अफूची बोंडे जप्त केली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. तानाजी शांताराम हगवणे (वय ४८), शिवाजी बबन हगवणे (वय ५५, दोघे रा. किरकटवाडी, सिंहगड रस्ता) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. नांदोशी रस्त्यावर इंद्रप्रस्थ सोसायटीजवळ आरोपी हगवणे यांची शेती आहे. शेतात बेकायदा अफूची लागवड करण्यात आल्याची माहिती ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखा आणि हवेली पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. हगवणे यांनी शेतात अफूची लागवड केल्याचे आढळून आले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# लोकशाहीच्या संरक्षणासाठी काँग्रेस काळाची गरज

## काँग्रेस कमिटीच्या राज्य महासचिव उत्कर्षा रुपवते

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** लोकशाहीच्या संरक्षणासाठी काँग्रेसची विचारधारा ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन काँग्रेस कमिटीच्या राज्य महासचिव उत्कर्षा रुपवते यांनी यावेळी बोलताना केले.
नेवासा येथे आयोजित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा झालेल्या बैठकीत शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या संभाव्य उमेदवार उत्कर्षा रुपवते हया बोलत होत्या. तर काँग्रेसचे नूतन अहमदनगर जिल्हा अध्यक्ष जयंतराव वाघ हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. सदर बैठकीत काँग्रेस कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उत्कर्षा रुपवते म्हणाल्या की लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेसची विचारधारा काळाची गरज आहे त्यासाठी जनतेने विचारपूर्वक मतदान करावे असे आवाहन करून त्यांनी राष्ट्राच्या जडणघडणीत काँग्रेसचे असलेले योगदान व बलिदान त्याग आपल्या भाषणातून बोलताना विषद केला.





अध्यक्षीय भाषणात जयंत वाघ म्हणाले की आपल्या लोकशाहीवर सध्या हुकूमशाहीचे संकट आले आहे सत्तेचा दुरुपयोग करून केंद्र सरकार नेत्यांना त्रस्त करत आहेत त्यासाठी प्रत्येक नागरिकाने जागृत राहून निवडणुकांमध्ये सक्रिय भाग घेतला पाहिजे. ज्ञानदेव वाफारे यांनी निवडणूक प्रक्रियेच्या संदर्भात सविस्तर विवेचन केले त्यांनी नियोजनाला उच्च महत्त्व असल्याचे प्रतिपादित केले जुनी निवडणूक पद्धत पारंपारिक निवडणूक पद्धत व आता उच्च तंत्रज्ञानाची सूक्ष्म पातळीवर तसेच अभ्यासपूर्वक कार्यान्वित करण्याची निवडणूक प्रक्रिया यासंदर्भात कार्यकर्त्यांना सखोल मार्गदर्शन केले.
या मेळाव्याला सहकारी बँकेचे ज्येष्ठ संचालक संपतराव म्हस्के पाथर्डी विधानसभेचे निरीक्षक फ्रान्सिस साठी शेवगावचे निरीक्षक अभिजीत लुणिया, नेवासा विधानसभेचे निरीक्षक ज्ञानेश्वर माऊली मुरकुटे, नेवासा तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पटारे,अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष राजेंद्र वाघमारे, प्रदेश समन्वयक ज्ञानदेव वाफारे, ॲड. कल्याणराव पिसाळ, वसंतराव रोटे, जिल्हा सचिव रंजनदादा जाधव, रमेश जाधव, जगन्नाथ पाटील महिला अध्यक्ष शोभा पातारे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वसंतराव रोडे यांनी सद्यस्थितीवर प्रकाश टाकला यावेळी झालेल्या बैठकीचे सूत्रसंचालन बाळासाहेब झावरे यांनी केले तर कार्यक्रमाचे ऋणनिर्देश अत्यंत प्रभावीपणे व समारोपामध्ये सर्व त्यांच्या विचारांचा सार मांडत कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी आभार मानले.

# ॲड. त्र्यंबकराव गणपतराव शिरसाठ यांचा दणदणीत विजय


आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**
**छत्रपती संभाजीनगर :** येथे IFFCO मराठवाडा विभाग पंचवार्षिक सभा पार पडली व त्या आरजीबी पदासाठी निवडणूक झाली. या निवडणुकी साठी मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व बुलढाणा असे एकूण ९ जिल्हाचे प्रतिनिधी हजर होते. या निवडणुकीत आरजीबी पदासाठी एकूण दोन उमेदवारी अर्ज आले होते. निवडणुकीत एकूण ६५ मतदार होते. त्या पैकी एकूण ५८ मतदारांनी त्याच्या मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिय नंतर दुपारी ३ वा. मत मोजणीची प्रक्रिया सुरु झाली. मत मोजणी अंती निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणुकीचा निकाल घोषीत केला. त्या मध्ये 1) श्री. ॲड. त्रिंबकराव गणपतराव शिरसाठ यांना एकूण ३४ मते मिळाली तर त्यांचे विरोधी उमेदवार निलेश विनायक धनदर यांना एकूण २३ मते मिळाली तसेच १ मतदान बाद झाले. निवडूक निर्णय अधिकारी एस. एन. कुलकर्णी यांनी ॲड. त्रिंबकराव गणपतराव शिरसाठ यांचा ११ मताच्या मताधिक्याने विजयी घोषीत केले. ॲड. त्रिंबकराव गणपतराव शिरसाठ यांना निवडून आल्या बाबत चे प्रमाण पत्र दिले. ॲड. शिरसाठ हे निवडून आल्या बद्दल त्यांचे संपूर्ण मराठवाडा विभागा व बुलढाणा जिल्ह्यातून अभिनंदन केले जात आहे. त्यांच्या निवडी मध्ये सर्व विभागातील भाजपा व इतर मित्रपक्षाचे कार्यकर्त्यांचा मोलाचा वाटा आहे.



# ७७ गावांत पाणी पेटले!

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** मार्चच्या पहिल्या पंधरवाड्यातच जिल्ह्यातील पाणी टंचाईची दाहकता वाढली असून एक लाखावर ग्रामस्थांना याची झळ पोहोचत आहे. लोकसभेच्या निवडणुकीचा माहौल असल्याने पाणी टंचाईची समस्या आणि ग्रामस्थांचे होणारे बेहाल याकडे लक्ष द्यायला नेतेमंडळींना सवड नाही. मार्चच्या पूर्वार्धातच टँकरची संख्या दुहेरी झाली आहे. सध्या ४ तालुक्यातील १३ गावांना टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठयावर तहान भागविण्याची वेळ आली आहे.
यामध्ये देऊळगाव राजा तालुक्यातील कुंभारी, पिंपळगाव चिलमखा, सुरा,चिखली मधील हातनी, कोलारा, सातगाव भुसारी, डोंगरशेवली, धोडप, पळसखेड, बुलढाणामधील वरवंड, पिंपरखेड, या गावांतील एकूण ३५ ,३४६ गावकऱ्यांचे बेहाल होत आहे. टँकरद्वारे होणारा पुरवठा तोकडा पडत असल्याने गावकरी प्रामुख्याने महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. दुसरीकडे ७ तालुक्यांतील ६४ गावांची तहान अधिग्रहित खाजगी विहिरीद्वारे भागविली जात आहे. यासाठी ८१ विहिरी अधिग्रहित करण्यात आली आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील १९ गावांना तब्बल ३१ विहिरीद्वारे पुरवठा होत आहे. चिखलीत १४ गावांना १९ तर मेहकर तालुक्यातील १९ गावांना १९ विहिरीद्वारे पुरवठा करण्यात येत आहे.

# डॉ. अविनाश जोशी: जीवन आणि परंपरा बदलणारा एक दूरदर्शी उद्योजक

आधुनिक केसरी न्यूज





**सय्यद आरेफ़**
**पिशोर :** चिकाटी आणि उद्योजकतेच्या उल्लेखनीय कथेत, डॉ. अविनाश गुलाबजी जोशी हे महाराष्ट्र मधील नादरपूर गावातून सुरुवात करून यशाचे दिवाण म्हणून उदयास आले आहेत. वयाच्या 28 व्या वर्षी या व्यक्तीने केवळ स्वतःचे नाव निर्माण केले नाही तर 600 हून अधिक लोकांना रोजगारही दिला आहे. छत्रपती संभाजी नगर ( औरंगाबाद )जिल्ह्यात, कन्नड तालुक्यात कठीण परिस्थितीत वाढलेल्या डॉ. जोशी यांचा जिद्द आणि त्यांच्या पालकांच्या मेहनतीबद्दलची कृतज्ञता यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही भरभराट होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा वाढली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून वाणिज्य शाखेतील पदवी आणि ॲक्युप्रेशर, निसर्गोपचार आणि मानसशास्त्र या विषयात प्राविण्य प्राप्त करून, त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली.
रोजगार शोधण्याचा पारंपरिक मार्ग सोडून डॉ. जोशी यांनी उद्योजकतेचे स्वप्न साकारले. अध्यात्मातील त्यांच्या आवडीमुळे त्यांनी समर्पण ग्रुपच्या माध्यमातून श्री वैदिक विज्ञान संशोधन केंद्राची स्थापना केली, ज्याचा उद्देश धर्मशास्त्र सर्वांसाठी उपलब्ध आहे.
वयाच्या 26 व्या वर्षी, डॉ. जोशी यांनी राजस्थानच्या व्यवसायासाठी अनुकूल वातावरणाचा लाभ घेत भारतभर सहाशेहून अधिक लोकांना रोजगार देणारा उपक्रम स्थापन केला. साबण, पूजा साहित्य, धूप आणि केसांचे तेल यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचे उत्पादन हे प्राचीन ग्रंथांवर आधारित भारतीय परंपरा पुनरुज्जीवित करण्याची त्यांची वचनबद्धता दर्शवते.
अदिती ज्योतिष आणि मार्गदर्शन केंद्र, हिंदयुवा बिझनेस कन्सल्टंट, समर्पण अल्टरनेटिव्ह हेल्थ क्लिनिक, समर्पण पब्लिकेशन, दत्तांश ॲग्रो प्रा. लि. यासह अनेक संस्थांचे संस्थापक, डॉ. अविनाश जोशी यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यापैकी इंडियन आयडॉल ऑफ इम्प्रेशन 2019, महाराष्ट्र युथ आयकॉन 2020, क्रिएटिव्ह आंत्रप्रेन्योर ऑफ इंडिया 2023 आणि नॅशनल प्राइड अवॉर्ड 2023 ही शीर्षके उल्लेखनीय आहेत. त्यांच्या कामगिरीच्या यादीत भर घालत, डॉ. जोशी यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल अलीकडेच भारतातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिसऱ्या मंदिरा* अंतर्गत समाजातील विविध क्षेत्रात आपली उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव व्हावा.या गौरावातून प्रेरित होऊन त्यांनी आपले समाजसेवेचे व्रत अविरत पणे कायम चालू ठेवावे या साठी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शिवतीर्थ जळकीबाजार मार्फत राज्यस्तरीय छत्रपती उद्योग सेवा गौरव पुरस्कार 2024 ने सन्मानित करण्यात आले आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर